



विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी


खरं तर अर्जुन म्हणजे निमित्त. अर्जुनाचे निमित्त करून भगवंतांनी गीता आपल्यासाठीच सांगितली आहे. जीवनात जरी अनेक संकटे आली तरी आपल्या कर्तव्यापासून ढळू नका, आपले कर्म उत्तम प्रकारे करा. तीच भगवंताची खरी पूजा आहे आणि तीच त्यांना अतिशय प्रिय आहे. हाच गीतेचा संदेशही आहे. आपण दररोज परमेश्वराची पूजा करतो. त्याच्या पूजेसाठी उत्तमोत्तम सुगंधी आणि ताजी फुले निवडतो. त्यांचा सुंदर हार करतो आणि तो देवाला वाहतो. खाली पडलेली, खराब झालेली फुले आपण देवाला वाहण्यासाठी वापरत नाही. त्याला जे द्यायचे ते सर्वोत्तम असावे. पण खरं म्हणजे ही देवाची प्रतीकात्मक पूजा आहे. त्याची खरी पूजा बांधायची आपल्या कर्माने. जे काही निहित कर्म आपल्या वाट्याला आले आहे, ते त्याच्याच इच्छेने आहे असे समजून आपले कर्म उत्तम प्रकारे करावे. अशा या स्वकर्मरूपी कुसुमांचा हार त्याला अर्पण करावा. मग देवपूजा करताना जशी उत्तम फुले आपण निवडून घेतो, तशीच आपली कर्मे इतकी सुंदर असावीत, की त्याला अर्पण करताना आपल्यालाही आनंद आणि समाधान वाटावे. संत सावता माळी वारीला कधी नियमानं गेले नाहीत असं म्हटलं जातं. वारी म्हणजे नियम, एखादी गोष्ट वारंवार करणं. पण सावतोबांना तसं करण्याची गरज भासली नाही. त्यांनी आपल्या कर्मानेच भगवंताची पूजा बांधली. आपल्या भाजीपाल्याच्या शेतीतच त्यांना ईश्वराचे दर्शन होत होते. ' कांदा मुळा भाजी, अवघी विठाई माझी ' हीच त्यांची भावना होती. आपल्या वाट्याला आलेलं काम आनंदानं करायचं आणि मुखानं ईश्वराचं नाम घ्यायचं यापेक्षा सुंदर अशी ईश्वराची पूजा कोणती असू शकेल ! संत गोरा कुंभार सदैव ईश्वरभक्तीत लीन असायचे. पण आपलं काम त्यांनी कधी त्यासाठी थांबवलं नाही. संत गोरा कुंभार आपल्या एका अभंगात म्हणतात

**केशवाचे ध्यान धरूनि अंतरी । मृत्तिके माझारी नाचतसे ।।**
**विठ्ठलाचे नाम स्मरे वेळोवेळ । नेत्री वाहे जळ सद्‌गदित ।।**
**कुलालाचे वंशी जन्मले शरीर । तो गोरा कुंभार हरिभक्त ।।**

या सगळ्या संतांनी आपले स्वकर्मच मनोभावे करून त्या स्वकर्मकुसुमांची माला ईश्वराच्या चरणी अर्पण केली. केवळ संतच नव्हेत तर सगळ्या महापुरुषांनी आपल्या कर्तव्य पालनाने आपल्याला हाच आदर्श घालून दिला नाही काय ?

गीता असो वा भारतीय संस्कृती, पोकळ आध्यात्माच्या गप्पा त्यात आपल्याला आढळत नाहीत. गीता किंवा ज्ञानेश्वरीत सांगितलेले हे तत्वज्ञान सर्व धर्मांच्या पलीकडे आहे. किंबहुना आपले कर्तव्य हाच आपला धर्म असे ते सांगते. केवळ माणसातीलच नव्हे तर चराचरात ईश्वराचे रूप पाहायला आपल्याला ते शिकवते.



## आनंदी पहाट

## आर्थिक स्वातंत्र्य अधिक महत्त्वाचे

आधुनिक केसरी



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

अनेक लोक पैशाची पर्वा करत नाहीत; असे म्हणण्याचे एक कारण म्हणजे पैशाच्या प्रेमाला "सर्व वाईटाचे मूळ" असे वर्णन करण्यात आले आहे. हे खरे आहे, भौतिकवादी लोक पैशाचा ध्यास त्यांना त्यांच्या आर्थिक फायद्यासाठी वाईट गोष्टी करण्यास प्रवृत्त करू शकतात. पण प्रत्यक्षात पैसा हे देवाणघेवाणीचे माध्यम आहे. विविध प्रकारच्या वस्तू आणि सेवांसाठी तुमच्या श्रमाचा व्यापार करणे पैशामुळे सोपे होते. पैशांशिवाय, जर तुम्हाला अन्न हवे असेल, तर तुम्ही थेट देऊ शकत असलेल्या सेवेच्या बदल्यात किंवा तुम्ही उत्पादित करू शकणाऱ्या उत्पादनाच्या बदल्यात अन्नाचा व्यापार करण्यास इच्छुक असलेल्या व्यक्तीला शोधणे आवश्यक आहे. प्रत्येकजण हे ओळखतो की पैशाचे बाजारात एक विशिष्ट मूल्य आहे. म्हणूनच आपण इच्छित वस्तू किंवा सेवांसाठी त्याचा व्यापार करू शकतो. यामुळे बाजारातील तरलता वाढते, जी मालमत्ता किती सहज खरेदी किंवा विकली जाऊ शकते याचा संदर्भ देते. अर्थात, हे केवळ अशाच परिस्थितीत कार्य करते जेथे पैशाचे मूल्य स्थिर असते आणि हे मूल्य ही दुर्मिळ वस्तू आहे; या वस्तुस्थितीवरून प्राप्त होते. जेव्हा तुमच्याकडे बँकेत पुरेसा पैसा असतो, तेव्हा तुम्हाला तुमच्या डोक्यावर छप्पर असण्याची किंवा पुरेसे खाण्याबद्दल अथवा तुम्ही आजारी असताना डॉक्टरांना भेटण्यास सक्षम असण्याची चिंता करण्याची गरज नसते. याचा अर्थ असा की आपण स्थिर मध्यमवर्गीय जीवनाचा आनंद घेऊ शकतो. आपल्याकडील पैशाने आनंद विकत घेता येऊ शकत नसला तरीही; स्वातंत्र्य, सुरक्षितता आणि आपल्या स्वप्नांचा पाठपुरावा करण्याची शक्ती आपल्याला आनंदी बनवण्याच्या दिशेने खूप पुढे जाऊ शकते. म्हणूनच कठोर परिश्रम करणे, पैसे कमविणे आणि ते कसे वाचवायचे हे शिकणे खूप महत्वाचे आहे.



आधुनिक केसरी

## चौऱ्यांशीचा घाट | सोपा झाला |

काय सांगु सुख | संत दर्शनाचे ||
भाव अंतरीचे | शांत झाले ||१||
पाहिला शोधोनी | सुखाचा विसावा ||
लटका दिखावा | संसारात ||२||
मीपणाची बाधा | सुटता सुटेना ||
म्हणूनी भेटेना | सुख शांती||३||
जडू नये आता | आणिकांचा संग ||
समाधीचा भंग | होऊ नये ||४||
संत समागमी | सापडली वाट ||
चौऱ्यांशीचा घाट | सोपा झाला ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## निरुपण


आधुनिक केसरी

ऐसी अंतरप्रीति जडली । सार्वस्वाची सांडी केली ।
तंव ते मरोन गेली । अकस्मात ॥५८॥
तेणें मनीं शोक वाढला । म्हणे थोर घात जाला ।
आतां कैंचा बुडाला । संसार माझा ॥५९॥
जिवलगांचा सोडिला संग । अवचिता जाला घरभंग ।
आतां करूं मायात्याग । म्हणे दुःखें ॥६०॥

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

अन्धकार जीवन रहे, विन सत्संग दुराव ।
निज चरित्र सुधरे नहीं, दिब्य न हो स्वभाव ।।५४।। (स्वर्वेद पंचम मण्डल पंचम अध्याय) ०५/०५/५४


मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :
सत्संगाशिवाय जीवन कुमार्गावर जाते आणि अंधःकार प्राप्त होतो. त्यामुळे आपले चरित्र सुधरत नाही आणि दिव्य स्वभाव प्राप्त होत नाही.



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्‌गुरू सदाफल देवजी महाराज

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

## समर्थ रामदास




समर्थांनी शंकराची आरती लिहिली, त्याची कथा मोठी गमतीशीर आहे. तीर्थयात्रा करताना समर्थ जेजुरीला आले. तिथे खंडेरायाचे दर्शन घेऊन ते लवथेश्वराला आले. जो कोणी मंदिरात झोपतो तो रात्रीच मरण पावतो, अशी या मंदिराची ख्याती होती. हे कळल्यावर समर्थांनी मुद्दाम मंदिरातच झोपायचे ठरवले. ग्रामस्थांनी त्यांचे मन वळविण्याचा प्रयत्न केला पण समर्थ तसे हट्टी होते. सकाळी ग्रामस्थांनी मंदिरात भीत भीतच प्रवेश केला. पाहतात तर काय! समर्थ भगवान लवथेश्वराची पूजा करीत होते. त्याच वेळी 'लवथवती विक्राळा ब्रम्हांडी माळा' या प्रसिद्ध आरतीची निर्मिती झाली. समर्थांनी खंडेराया, दत्तात्रय, विठ्ठल, श्रीकृष्ण, दशावतार अशा विविध देवांच्या आरत्या केल्या आहेत. रामदासस्वामींनी श्रीमत् ग्रंथराज 'दासबोध' या पारमार्थिक ग्रंथाची रचना (महाडजवळील) शिवथरघळ येथे केली.[१०]

दासबोधाशिवाय रामायणांतील किष्किंधा, सुंदर व युद्ध ही कांडे, कित्येक अभंग, आरत्या, भूपाळ्या, पदे, स्तोत्रे, राज-धर्म, क्षात्र-धर्म, शिवाजीमहाराज, संभाजीमहाराज यांस पत्रे, आपल्या शिष्यांना मार्गदर्शन, मठ आणि त्यांतील उत्सव यांसंबंधी मार्गदर्शन, आत्माराम, अन्वय-व्यतिरेक, वैराग्य-शतक, ज्ञान-शतक, उपदेश-शतक, षड्रिपु-विवेक इत्यादी विषयांवरील विपुल लेखन समर्थांनी केले आहे. समर्थांची शिकवण कशी व्यावहारिक शहाणपणाची, सावधानतेची, आत्मविश्वास उत्पन्न करणारी, रोखठोक आणि राजकारणी स्वरूपाचीही होती. एका दृष्टीने समर्थांच्या शिकवणुकीचे सार केवळ काही शव्दांत सांगता येते - कर्म ,उपासना, ज्ञान, विवेक. भक्ती, प्रयत्न व सावधानता. समर्थांनी राष्ट्रउभारणीसाठी जसे बहुमोल मार्गदर्शन केले तसेच लोकशिक्षण, प्रपंच, परमार्थ, विवेक या गोष्टींवरही भर दिला; कारण यातूनच राष्ट्र उभे राहते, स्वराज्य स्थापन होते. लोकांनी साक्षर व्हावे यासाठी त्यांनी लिहिण्याची, वाचण्याची मोहीम काढली. आपल्या वचनांत ते म्हणतात- 'दिसा माजी काही तरी ते लिहावे, प्रसंगी अखंडीत वाचीत जावे' त्याचबरोबर त्यांनी असेही सांगितले -जे जे आपणासि ठावे। ते ते इतरांसि शिकवावे। शहाणे करून सोडावे सकळ जन।। प्रपंच सोडून जर परमार्थ केला, तर केवळ आत्मोन्नती होईल परंतु प्रपंच करून परमार्थ केला, तर राष्ट्रोन्नती होईल म्हणून ते म्हणतात की - प्रपंची जे सावधान। तोचि परमार्थ करील जाण। प्रपंची जो अप्रमाण। तो परमार्थी खोटा।।याशिवाय गाणे कसे असावे हे सांगताना समर्थ लिहितात, बाळके श्वापदे पक्षी। लोभती वेधती मनी।

## गुरु सांगेल तेच साधन

आधुनिक केसरी

परमार्थ म्हणजे काय, हे मी तुम्हाला अगदी थोडक्यात सांगतो. परमार्थाचे जर काही मर्म असेल तर, आसक्ती सोडून प्रपंच करणे हे होय. ज्याने आपल्याला प्रपंच दिला त्याचाच तो आहे असे समजून वागले, म्हणजे आपल्याला त्याबाबत सुखदुःख बाधत नाही. हे साधण्यासाठी गुरुमुखाने दिलेले परमात्म्याचे नाम आपण घेत असावे. गुरू कुणाला करावे ? जिथे आपले समाधान होते तेच गुरुपद म्हणावे. गुरुपद कुठेही एकच असते. गुरूला कुठे आडनाव असते का ? गोंदवलेकर गोंदवल्यास राहत असतील; दुसरा कुणी आणखी कोणत्या गावी राहत असेल. म्हणून लौकिक आडनाव जरी निराळे झाले, तरी गुरुपद हे सर्वकाळी अबाधित असेच असते. तुमचे जिथे समाधान झाले त्याला गुरू समजा, आणि तो जे साधन सांगेल त्यातच त्याला पाहा; त्याच्या देहाकडे पाहू नका. तो लुळापांगळा आहे की काय, हे पाहू नका. तो देहाने कसाही असला, तरी त्याने सांगितलेल्या साधनात रहा. त्याची लाज, जिथून गुरुपद निर्माण झाले, त्याला असते. गुरुआज्ञा हाच परमार्थ; तो सांगेल तेच



साधन. तुम्ही आपल्या मनाने काही ठरवून करू लागलात, तर त्यात तुम्हाला यश येणार नाही. अभिमान धरून काही करू लागलात, तर ते साधणार नाही. म्हणून अभिमान सोडून गुरूकडे जा. गुरू सांगेल तेच साधन हे पक्के लक्षात ठेवा. खरा परमार्थ हा लोकांना उपदेश करण्यासाठी नाही, तो स्वतःकरता आहे. आपला परमार्थ जगाला जितका कमी दिसेल, तितका आपल्याला फायदेशीर आहे. जगातल्या मोठेपणात मुळीच सार्थकता नाही. खरा मोठेपणा नसताना उगीच मोठेपणा वाटणे, हा तर फार मोठा घात आहे. एकाने कोळशाचे दुकान घातले आणि दुसऱ्याने पेढ्याचे दुकान घातले; दुकान कशाचेही असले, तरी शेवटी फायदा किती होतो, याला महत्त्व आहे. तसे, प्रपंचात कमी जास्त काय आहे याला परमार्थात महत्त्व नसून, मनुष्याची वृत्ती भगवंताकडे किती लागली याला महत्त्व आहे. परमार्थाला कोणतीही परिस्थिती चालते. आपली वृत्ती मात्र स्थिर असली पाहिजे. एकीकडून मनाचे संयमन आणि दुसरीकडून भक्तीचा जोर असला, म्हणजे परमार्थ लवकर साधतो. खरोखर, परमार्थ इतका सोपा आहे, की तो सहज रीतीने करता येतो. पण गंमत अशी, की तो सोपा आहे म्हणून कुणीच करीत नाही. प्रपंच हा परमार्थाच्या आडकाठीसाठी नाही, तो परमार्थासाठीच आहे, हे पक्के लक्षात ठेवावे. साधकाने देहाचे कर्तव्य प्रारब्धावर टाकून, मनाने मात्र ईश्वरोपासना करावी. १९६. हृदयी ठेवा राम । मुखी सदा त्याचे नाम । हातात असावे प्रपंचाचे काम । हेच खरे परमार्थाचे मर्म ॥

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
बुधवार, २९ नोव्हेंबर २०२३
adhunikkesari.com Adhunik Kesari

राजस्थानी मल्टीस्टेट
कार्यक्षेत्र महाराष्ट्र-कर्नाटक
राजस्थानी मल्टीस्टेट
को-ऑप. क्रेडीट सो.लि., परळी वैजनाथ
बँकींग • आरोग्य • शिक्षण • रियल ईस्टेट • इन्शुरन्स
मुख्य कार्यालय : मोंढा, परळी वैजनाथ, जि. बीड. मो. 9130072178, 9130072188 | कॉर्पोरेट ऑफिस : २०५,२०६, बिल्डिंग नं. २, पहिला मजला, अपना बाजार, जालना रोड, औरंगाबाद . मो. 9130072176,
टोल-फ्री : 18004197501 rajasthanimultistate.in | संपर्क अनंत भाग्यवंत ९१३००७२१८९

चंदुलाल बियाणी
संस्थापक अध्यक्ष
Rajasthani Multistate MINI BANKING
www.rajasthanimultistate.in
Powered by Tatkal Banking
आता बँकिंग व्यवहार करणे झाले सोपे... राजस्थानी मल्टीस्टेट को-ऑप. क्रेडीट सो.लि.,चा
तात्काळ बँकिंगच्या माध्यमातून तब्बल ४९८ बँकांशी होणार सेकंदात व्यवहार...
कोणतेही बँकिंग व्यवहार करणे फक्त 9 सेकंदात शक्य
तात्काळ बँकिंग सुविधा
रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया मान्यताप्राप्त, NPCI द्वारे संचलित भारत बिल पेमेंट सिस्टम (BBPS), मोबाईल/डी.टी.एच. रिचार्ज आणि इतर सुविधा
* नियम व अटी लागू
कोणत्याही बँकेत पैसे डिपॉझिट करणे. | कोणत्याही बँकेत पैसे ट्रान्सफर करणे. | कोणत्याही बँकेतून पैसे काढणे | मोबाईल बँकिंग सुविधा | Bank Account Verification सुविधा | NEFT/RTGS सुविधा | IMPS/UPI सुविधा | आधार पेमेंट सुविधा | QR Code सुविधा

# 34 रुपये लिटरप्रमाणे दुधाचा भाव मिळावा

## काँग्रेसचे नेते बाळासाहेब थोरात यांची मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**अकोले :** दुधाला 34 रुपये भाव मिळावा या मागणीसाठी उपोषणाला बसलेल्या संदीप दराडे, कॉ. अजित नवले आणि सहकाऱ्यांची आज काँग्रेस विधिमंडळ पक्षाचे नेते बाळासाहेब थोरात यांनी भेट घेतली, उपोषणकर्त्यांनी उपोषण मागे घेण्याची ही त्यांनी विनंती केली.

यावेळी बोलताना थोरात म्हणाले, दुधाचा विषय हा गरीब माणसाच्या अत्यंत जवळचा आणि जिव्हाळ्याचा आहे. 25 ते 28 रुपये लिटरने गायीचे दूध विकणे शेतकऱ्यांना परवडू शकत नाही. शासनाने या विषयावर सामोपचाराने तोडगा काढण्याची आवश्यकता आहे. दूध दाराच्या प्रश्नावर सरकारी हस्तक्षेपाची वेळ आलेली आहे. शेतकऱ्यांना किमान 34 रुपये लिटर प्रमाणे दुधाचा भाव मिळण्यासाठी गरज पडल्यास सरकारने मदत करावी. थोरात पुढे म्हणाले, यापूर्वी 34 रुपये



असलेला दर 25 रुपयांपर्यंत खाली आलेला आहे. जेव्हा दुधाचे भाव वाढतात तेव्हा गाईच्या खाद्याचेही भाव वाढतात. आता जेव्हा दुधाचे भाव कमी झाले तेव्हा 25 ते 28 रुपये लिटरच्या दरम्यान दुधाची निर्मिती करणे उत्पादकांना शक्य होणार नाही अगोदरच अडचणीत असलेला शेतकरी यामुळे अधिक अडचणीत जातो आहे. दूध उत्पादक शेतकऱ्यांना अशा काळात दिलासा देणे ही शासनाची जबाबदारीच आहे. दूध किंवा शेतीमालाला परवडणाऱ्या भावापर्यंत नेऊन पोहोचविण्यासाठी सरकारी हस्तक्षेप आवश्यक झालेला आहे, आणि ह्या न्याय मागणीसाठी कार्यकर्त्यांना सहा-सहा दिवस उपोषण करावा लागत असेल तर ते भूषणावह नाही. महाराष्ट्राच्या शेतकरी बांधवांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या या प्रश्नाकडे सरकार दुर्लक्ष करत असेल तर सरकार आहे की नाही असा प्रश्न सर्वसामान्य जनतेसमोर निर्माण होतो असेही थोरात म्हणाले. दरम्यान जेष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांनी विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांना संपर्क करून या विषयाचे गांभीर्य सरकारच्या निदर्शनास आणून देण्याची सूचना केली. तसेच जिल्हाधिकारी अहमदनगर यांनाही फोन करून, अकोले येथे सुरू असलेले उपोषण तातडीने थांबविले जावे यासाठी पुढाकार घेऊन सकारात्मक तोडगा काढावा असा आग्रह धरला.

# राज्यस्तरीय ॲथलेटिक्स स्पर्धेत हरिभाऊ राऊत यांना कांस्य पदक

## पहूरच्या शिरपेचात मानाचा तुरा

आधुनिक केसरी न्यूज

**पहूर :** येथील महात्मा फुले शिक्षण संस्था संचलित सावित्रीबाई फुले माध्यमिक विद्यालयाचे क्रीडा शिक्षक तथा शौर्य स्पोर्ट्स अकॅडमी चे सचिव हरीभाऊ राऊत यांनी अमरावती येथे आयोजित द्वितीय राज्यस्तरीय खेलो मास्टर्स गेम्स स्पर्धेत १५०० मिटर्स ॲथेलेटिक्स स्पर्धेत कांस्य पदकाची कमाई केली .

श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावती, महाराष्ट्र खेलो मास्टर्स गेम्स असोसिएशन व अमरावती जिल्हा खेलो मास्टर्स गेम्स असोसिएशन यांचे संयुक्त विद्यमाने दि. २४ ते २६ नोव्हेंबर दरम्यान आयोजित द्वितीय महाराष्ट्र राज्य खेलो मास्टर्स गेम्स स्पर्धेत महात्मा फुले शिक्षण संस्था संचलित सावित्रीबाई फुले माध्यमिक विद्यालयाचे क्रीडा शिक्षक हरिभाऊ राऊत यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. १५०० मिटर्स धावणे, ॲथलेटिक क्रीडा प्रकारात त्यांनी कांस्यपदक पटकावले. अमरावती स्पर्धेचे उदघाटन खासदार नवनीत राणा यांनी क्रीडा ज्योत प्रज्वलीत करून केले. अध्यक्षस्थानी श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष तथा माजी कृषी मंत्री हर्षवर्धन देशमुख तर प्रमुख अतिथी म्हणून श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे कोषाध्यक्ष दिलीप इंगोले, आमदार बळवंत वानखेडे, माजी महापौर विलास इंगोले यांची उपस्थिती होती. प्रास्ताविक शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालयाच्या प्राचार्या अंजली ठाकरे यांनी तर सूत्रसंचालन शिवछत्रपती पुरस्कार्थी डॉ नितीन चवाळे यांनी केले. विजेते हरीभाऊ राऊत यांना मान्यवरांच्या हस्ते कांस्य पदक आणि सन्मानपत्र प्रदान करण्यात आले . विद्यार्थ्यांना तायक्वांदो, कराटे, ॲथलेटिक स्पर्धांमध्ये राज्यस्तरावर विविध पदकांची



कमाई करण्यासाठी मार्गदर्शन करणारे हरिभाऊ राऊत यांनी स्वतः सहभागी होऊन कांस्य पदक पटकावले. त्यांच्या यशाबद्दल महात्मा फुले शिक्षण संस्थेचे अध्यक्ष बाबुराव अण्णा घोंगडे, उपाध्यक्ष शांताराम दादा पाटील, सचिव भगवान आण्णा घोंगडे, सन्माननिय सर्व संचालक मंडळ सावित्रीबाई फुले माध्यमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका श्रीमती व्ही. व्ही. घोंगडे सर्व सन्माननीय शिक्षक वृंद शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी आदींनी अभिनंदन केले. अनिल पवार यांचे सहकार्य लाभले.

# कंपनीच्या दूषित पाण्यामुळे शेतकऱ्याची आत्महत्या

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** तालुक्यातील एमआयडीसी क्षेत्रातील



केमिकल कंपनीचे दूषित पाणी विहिरीत येत असल्याने मुधलवाडी येथील शेतकऱ्याने विहिरीत उडी मारुन आत्महत्या केल्याची घटना शनिवार दिनांक २५ नोव्हेंबर रोजी घडली आहे.

मुधलवाडी येथील शेतकरी जगन्नाथ आसाराम बोडखे यांनी आपल्या शेतात गट नंबर २२६ मधील शेतात असलेल्या विहिरीत उडी मारून आत्महत्या केली. पैठण एमआयडीसी मधील केमिकल कंपन्याचे दूषित पाणी विहिरीत येत असल्याने माझ्या वडिलांनी नैराश्यामधून आत्महत्या केल्याची तक्रार जगन्नाथ बोडखे यांचा मुलगा शुभम जगन्नाथ बोडखे यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात दिली आहे.

केमिकल कंपनीच्या दूषित पाण्यामुळे जगन्नाथ बोडके यांच्या विहिरीला केमिकल युक्त पाणी येत होते. या प्रदूषित पाण्याची तक्रार बोडखे यांनी जिल्हा प्रदूषण नियमक मंडळाकडे तसेच कंपनी आणि तहसीलदाराकडे देखील वेळोवेळी केली होती.

या दूषित पाण्याने शेतीत पिके देखील चांगली येत नसल्याने जगन्नाथ बोडखे हे मागील काही वर्षापासून शेती उत्पन्नात घट होत असल्याने या पाण्यामुळे जमीन खराब झाली या विंवचनेत राहत असत या घटनेबाबत जगन्नाथ बोडखे यांचा मुलगा शिवम याने रविवार दिनांक २६ नोव्हेंबर रोजी पैठण एमआयडीसी पोलीस ठाण्यात तक्रार देऊन आपल्या वडिलांच्या आत्महत्येस पैठण एमआयडीसी भागातील केमिकल कंपन्या जबाबदार असल्याचे म्हटले आहे.

या बाबत यापूर्वी या भागातील शेतकरी व स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने प्रदूषण मंडळ,तालुका कृषी कार्यालय,तसेच पाणी व जमिन तपासणी करून अहवाल प्राप्त केले त्यानुसार केमिकल मुळे विहिरीचे पाणी शेती तसेच वाफरायोग्या नसल्याचे यात म्हटलं आहे.

# महामार्ग पोलीसांकडून जागतिक स्मरण दिनानिमित्त विविध उपक्रम साजरे

आधुनिक केसरी न्यूज

**धाराशिव :** महामार्ग सुरक्षा पथक, छत्रपती संभाजीनगर प्रादेशिक विभागाच्यावतीने व अप्पर पोलीस महासंचालक (वा.)डॉ.श्री रविंद्रकुमार सिंगल यांच्या संकल्पनेतुन व श्री अरविंद माळवे, पोलीस अधीक्षक महामार्ग सुरक्षा विभाग (मुख्यालय), महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्या मार्गदर्शनाखाली दि. २२/११ रोजी जागतिक स्मरणदिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्ष्या डॉ.अनिता जमादार, पोलीस अधीक्षक, महामार्ग सुरक्षा प्रादेशिक विभाग, छत्रपती संभाजीनगर यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमावेळीं अपघातग्रस्तांसाठी कायदेशीर प्रकीयेबाबत ॲड. रविंद्र गोरे यांनी माहिती देताना अपघात झाल्यानंतर क्लेम दाखल करते वेळी चुकीचे कागदपत्र जोडण्याचे परिणाम काय होतात, अज्ञात वाहनाचा शोध घेणे, इनकम टॅक्स रिटर्न्स भरणे, बँक पासबुक अपडेट करणे यावर व्यवस्थितपणे मार्गदर्शन केले.त्याचबरोबर कार्यक्रमासाठी आवर्जून उपस्थित असणारे डॉ. फैजल (एम.एस. ऑर्थो)आयकॉन हॉस्पीटल यांनी अपघातग्रस्तांचे रक्तस्त्राव थांबवून, त्या व्यक्तीला चांगली मदत कशी मिळून द्यायची यावर मार्गदर्शन केले. अध्यक्षीय भाषणामध्ये डॉ. अनिता जमादार, पोलीस अधीक्षक महामार्ग प्रादेशिक विभाग, छत्रपती संभाजी नगर यांनी सर्व मृत्युंजय दुत यांना येणा-या अडचणीचे निराकरण करणे याबाबत आश्वासन दिले. वाहन ओव्हरस्पीड न चालविणे तसेच वाहन विनाहेल्मेट न चालवणे, वाहतुकीचे नियम पाळणे बाबत मार्गदर्शन केले.



यावेळी सुत्रसंचालन स.पो.नि. श्री अभय दंडगव्हाण व स.पो.नि.कल्पना राठोड तर पोलीस निरीक्षक श्री गणेश गिरी, महामार्ग सुरक्षा विभाग, छत्रपती संभाजी नगर यांनी आभार व्यक्त केले. सदर कार्यक्रमास बहुसंख्येने मृत्युंजय दुत उपस्थित होते. तसेच छत्रपती संभाजी नगर विभागातील वेगवेगळया ठिकाणी अपघातामध्ये पिडीत झालेल्या व्यक्तींचे नातेवाईकही या कार्यक्रमासाठी हजर होते. त्यामध्ये महामार्ग सुरक्षा पथक,धाराशिव कार्यक्षेत्रातील अपघातग्रस्त व्यक्ती श्री मनोज मगर, रा. शिंगोली,ता. जि. धाराशिव व मृत्युंजय दुत श्री अमर मगर, रा. शिंगोली, ता.जि.धाराशिव यांनी सहभाग घेतला. सदर कार्यक्रमास हजर असलेल्या मृत्युंजय दुत यांनी केलेल्या कागगिरीबददल प्रशस्तीपत्र व पुष्पगुच्छ देवून सत्कार करण्यात आला.

# आंबेडकरांना भीती

आधुनिक केसरी

वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर हे सातत्याने सत्ताधाऱ्यांवर वेगवेगळे आरोप करत आहेत. देशातले वातावरण अस्थिर असून दंगली घडवण्याचा प्रयत्न केला जात आहे, असा दावा त्यांनी अलिकडच्या काही महिन्यांमध्ये अनेकदा केला आहे. आता पुन्हा एकदा त्यांनी अशाच प्रकारचे वक्तव्य केले आहे. प्रकाश आंबेडकर म्हणाले, येत्या सहा डिसेंबरनंतर म्हणजेच महापरिनिर्वाण दिनानंतर देशात काहीही घडू शकते. हवे तर तुम्ही कोणत्याही पोलीस ठाण्यात जाऊन चौकशी करा, कारण तशा पद्धतीच्या सूचना पोलिसांना मिळाल्या आहेत. प्रकाश आंबेडकर म्हणाले, दुर्दैवाने देशात मुस्लिमांना लक्ष्य केलं जातंय. दुसऱ्या बाजूला ओबीसीच्या आरक्षणाला लक्ष्य केले जाते. ज्यांचा या लढ्याशी संबंध नाही, ओबीसींच्या लढ्याशी संबंध नाही, ते हा लढा आपल्या ताब्यात घेऊन दंगली करतील. या दंगली कशा वाढतील अशा स्वरुपाची वक्तव्ये केली जात आहेत. पाच राज्यांच्या निवडणुकीनंतर देशात गंभीर परिस्थिती निर्माण होऊ शकते. सध्या देशात मध्य प्रदेश, छत्तीसगड, राजस्थान, तेलंगणा, मिझोरम या पाच राज्यांमध्ये विधानसभा निवडणूक चालू आहेत. या सर्व राज्यांच्या निवडणुकीचा निकाल ३ डिसेंबर रोजी लागणार आहे. या निवडणुकींच्या निकालाच्या पार्श्वभूमीवर प्रकाश आंबेडकर यांनी मोठे वक्तव्य केले होते. आंबेडकर म्हणाले होते, ३ डिसेंबरनंतर देशात कुठल्या ना कुठल्या भागात नरसंहार घडेल. प्रकाश आंबेडकर यांनी २५ नोव्हेंबर रोजी मुंबईत आयोजित संविधान सन्मान महासभेत हे वक्तव्य केले होते. प्रकाश आंबेडकर यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींचा थेट उल्लेख न करता त्यांच्यावर टीका केली होती. आंबेडकर म्हणाले होते, सध्या देशात आरक्षणाच्या नावाने समाजा-समाजांना एकमेकांविरोधात लढवले जाते आहे आणि हे थांबवण्याऐवजी त्यास खतपाणी घातले जाते आहे. २००२ मध्ये गोधरा हत्याकांड घडलं, २०२३ मध्ये मणिपूरमध्ये नरसंहार झाला. कदाचित ३ डिसेंबरनंतर देशातील कुठल्या ना कुठल्या भागात मोठा नरसंहार घडण्याची शक्यता आहे, हे लक्षात घ्या.

# दुखणं गुडघ्याला औषध डोक्याला



विनोद सदावर्ते
संपर्क क्र. 9130979300

आधुनिक केसरी

**देशातील व राज्यातील सामाजिक परिस्थिती पाहता दुखणं गुडघ्याला आणि औषधी डोक्याला अशीच परिस्थिती झाली आहे. दुखणं गुडघ्याला असताना औषध डोक्याला का लावले जाते तर औषधाची योग्य माहिती नसुन आजाराचे मुळही माहिती नाही म्हणून अशी गफलत झाली आहे. आज आरक्षणाची मागणी जोर धरत आहे. मुळात मराठा आरक्षणाची बाजुच चुकिच्या पद्धतीने मांडली जात आहे आणि त्यावर कोणीही लक्ष देत नाही. खरं तर सध्या महाराष्ट्रात आरक्षणासाठी जे आंदोलन सुरू आहे.**

ते आरक्षणासाठी नसुन कुणबी प्रमाणपत्रासाठी आहे आणि कुणब्यांना ओबीसी मध्ये अगोदरच आरक्षण आहे. मग कुणबी प्रमाणपत्र मागण्याच्या आंदोलनाला मराठा आरक्षण असे का दाखवले जात आहे? मागणी तर केवळ कुणबी प्रमाणपत्राची आहे. यावर विचार करणे आवश्यक आहे. दुसरी महत्त्वाची गोष्ट कुणबी प्रमाणपत्राची मागणी करताना अनेक ठिकाणी सभा,आंदोलन केले जात आहे तो अधिकारही संविधानाने दिलेला आहे. त्याबद्दल दुमत नाही. परंतु आरक्षणाचा फायदा घेण्यासाठी कुणबी दाखल्याची संविधानीक मागणी करताना इतरांविषयी चुकीचे बोलुन आरक्षणामुळे ते कमी गुणांवाले नोकरी वर लागतात, आम्हाला जास्त गुण असुन आम्हाला प्रवेश मिळत नाही. आरक्षण नसल्यामुळे आम्हाला शिक्षण व नोकरी पासून दुर रहावे लागते. अशा काल्पनिक व द्वेष पसरणाऱ्या पोस्ट कुणबी प्रमाणपत्र मागण्यासाठी घेण्यात आलेल्या सभेमधुन व कुणबी प्रमाणपत्र देण्यात यावे यासाठी केलेल्या समर्थना मधुन शेअर करण्यात येत आहे. स्वतः ला मागताना इतरांना असलेल्या बाबींना चुकिचे व हीन मानने कितपत योग्य आहे. बऱ्याच लोकांच्या वक्तव्यातुन बोलण्यातून आजही एकाच समाजाकडे बघुन टार्गेट केले जात आहे ते त्यांचे बौद्धिक मागासलेपण आहे. बौद्धिक मागासलेपण असणारे लोक हुशार व गुणवंत नसतात. कुणबी प्रमाणपत्राची मागणी सरकार कडे करत आहेत. परंतु विरोध व द्वेष आरक्षणाचा करत आहेत. यातून बौद्धिक परिपक्वता लक्षात येते. सरकारला काय बोलायचे ते बोलु शकता. आपल्या मागण्या मांडून सरकारवर दबाव आणु शकता. सरकार मध्ये बसलेले आमदार खासदार मंत्री बहुसंख्य मराठा ओबिसी च आहेत. त्यांना काय बोलायचे ते बोलु शकता. परंतु त्यांना न बोलता आरक्षणाच्या माध्यमातून एकाच जातीला टार्गेट करून स्वतः ची विद्वता सिद्ध करू शकत नाही. आरक्षण नसल्याने जास्त गुण असुनही नौकरी लागत नाही असे म्हणून आरक्षणाला दोष दिला जातो. परंतु आरक्षीत फक्त ५०% जागा आहेत. बाकीच्या ५०% टक्के जागा अनारक्षित आहेत. त्या जागेचे काय? त्या कशा भरल्या जातात? अनारक्षित जागेवर कोणाचे वर्चस्व आहे यावर कोणीही बोलत नाही. म्हणजे दुखणं एका ठिकाणी आणि औषध एका ठिकाणी लाऊन निव्वळ त्रास करून घेणे आहे. देशात महागाई वाढली आहे, बेरोजगारी वाढली आहे, शैक्षणिक फि मध्ये वाढही झाली आहे हे सर्व सत्य आहे परंतु त्याला जबाबदार आरक्षण आहे का? म्हणजे संविधानाने बोलण्याचा अधिकार दिला तर काही पण बोलायचे? कुणबी प्रमाणपत्र घेऊन अनेक मराठा तरुण उच्च शिक्षण घेत आहेत, घेतले आहेत, अनेक तरुण कुणबी प्रमाणपत्रावर नोकरी करत आहेत. मग कुणब्यांच्या समस्या सुटल्या अस म्हणायचं का? ओबिसी मध्ये शेकडो जाती आरक्षणाचा फायदा घेत आहेत. मग ओबिसी समुहाची गरीबी दुर होऊन सर्वांचा विकास झाला का? सर्वांना नोकरी लागली का?



आरक्षण गरीब दुर करत नाही, आरक्षण नौकरी लावत नाही. तर आरक्षण प्रत्येक क्षेत्रात प्रतिनिधित्व तयार करते हि बाब जोपर्यंत कळणार नाही तो पर्यंत आरक्षणाचे गांभीर्य लक्षात येणार नाही. मग आरक्षण घेणाऱ्या कुणबीसह ओबिसी समुदायात गरीबी नसायला पाहिजे? सर्वजण उच्च शिक्षीत व नोकरदार पाहीजे पण आहे का तर नाही. म्हणून अगोदर सर्व बाबींचा बरोबर विचार व अभ्यास करून मत मांडावे म्हणजे आपले अज्ञान दिसणार नाही. प्रत्येक समुहात बेरोजगार, गरिब आजही आहेत. याचे कारण आहे सरकारचे चुकीचे धोरण. कुणबी प्रमाणपत्र घेऊन आरक्षणाचा फायदा घेण्यासाठी जे आंदोलन सुरू आहे. कुणबी प्रमाणपत्र मिळाल्या नंतर वास्तविक आरक्षण कुठे शिल्लक आहे? आरक्षण असलेले क्षेत्र खाजगी लोकांना विकले जात आहे. खाजगी क्षेत्रात आरक्षण नसते. एकीकडे आरक्षणाचा फायदा घेण्यासाठी आंदोलन सुरू करायचे. परंतु आरक्षणच संपुष्टात येत असताना त्यावर एकही शब्द बोलायचा नाही याला काय म्हणावे. शिक्षणाचा व्यापार करून बालवाडीचे शिक्षण हजारो रूपयात विकले जात आहे तेव्हा त्यावर कोणीच बोलत नाही. संविधाना नुसार प्राथमिक शिक्षण मोफत असायला पाहिजे तिथे प्राथमिक शिक्षणावर हजारो लाखों रुपये खर्च होतात त्याविरुद्ध कोणी बोलत नाही. सरकारी कार्यालयात कंत्राटी नोकर भरती करून वेळेवर पगार दिला जात नाही याविषयी सुद्धां एकही शब्द बोलल्या जात नाही. गोरगरीब जनतेच्या विकासासाठी आमदार खासदार निधी करोडो रुपये येतो. त्या निधीचा खर्च सार्वजनिक करून जनते समोर मांडावा अशी मागणी कोणीही करत नाही. यातून हेच दिसून येते आपण आपल्या हक्क अधिकारा विषयी जागृत नाही म्हणून दुखणं एक आहे औषधी दुसरी कडे लावली जात आहे. कुणबी प्रमाणपत्र मिळावे म्हणून खुप मोठ्या संख्येने लोक एकत्रित येत आहेत एवढ्या मोठ्या संख्येने एकत्र आलेल्या लोकांनी खाजगीकरणावर बोलले तर खाजगीकरण थांबुन आरक्षणाचा फायदा तर मिळेलच शिवाय शासन नियमानुसार पगार व इतर सुविधा मिळतील. खाजगीकरण थांबले तर शैक्षणिक वाढलेल्या फि कमी होतील म्हणजे सर्वसामान्य लोकांना शिक्षण घेता येईल. मागील अनेक वर्षांपासून प्रत्येक शासकीय कार्यालयात पुरेसे कर्मचारी व अधिकारी नाहीत. या आंदोलनाच्या माध्यमातून रिक्त कर्मचारी व अधिकारी यांच्या जागा भरण्यात याव्या हि मागणी ही लाऊन धरली आणि अर्ध्या जागा जरी भरल्या गेल्या तरी लाखों जागा भरल्या जातील. लाखो जागा भरल्या जातील म्हणजे सुशिक्षित तरुणांना रोजगार मिळेल. शासनाने सरकारी नोकरी भरतीच बंद केली. आणि जनता इकडे टक्केवारी चे, गरिबीचे सिद्धांत मांडून आम्हाला नोकरी मिळत नाही म्हणून आपापसात भांडत बसते. एवढे आंदोलन आणि सभा घेऊनही मुळ मुद्यावर घाव न घातल्याने सरकार दखल घेत नाही आहे. आणि निवडणूक काळात दखल घेऊन, तात्पुरते दाखले देईल ही परंतु दाखला मिळाल्या वर शासकीय नोकर भरती तर पाहिजे. केवळ दाखला घेऊन प्रश्न सुटणार नाही तर खाजगीकरण थांबवून शासकीय नोकर भरती केली तर दाखल्याचा फायदा होईल. परंतु मुळ समस्या बाजूला सारून खाजगीकरणावर, सरकारी ध्येयधोरणावर न बोलता केवळ आरक्षणावर बोलुन आरक्षण नसल्याने आम्ही मागे आहोत, आणि आरक्षण असल्याने कमी मार्का वाले पुढे गेले म्हणजे कुणबी दाखला घेऊन नेमकं काय साध्य करायचे हे ही कळत नाही. अभ्यास नसलेल्या व द्वेष पसरवणाऱ्या लोकांना बाजूला सारून आंदोलन केले तर यशस्वी होईल. चुकिच्या लोकांना सोबत घेऊन त्यांचे अज्ञान समोर करून स्वतः ला ज्ञानी व गुणवान सिद्ध करताच येणार नाही. आणि एवढे करूनही कोणाला असे वाटत असेल की आम्ही आमच्या पद्धतीने करतो आम्हाला कोणी काही सांगण्याची गरज नाही तर त्यांनी एक गोष्ट लक्षात ठेवावी कि आपल्या बोलण्यातुन कृतीतून चुकिचे विचार व हिन भावना व्यक्त करून सामाजिक तेढ निर्माण करू नये. सरकारला काय मागायचे ते मागा कारण तो अधिकार संविधानाने दिला आहे. परंतु आम्हाला दिले नाही म्हणून इतरांकडे आहे ते चुकीचे आहे, किंवा त्यामुळे गुणवत्ता कमी होत आहे असे बोलणार असाल तर आपणही त्याच मार्गावर आहोत हे विसरू नये. चुकिच्या व द्वेष पसरवणाऱ्या लोकांमुळे च दुखणं गुडघ्याला असुन ही औषधी डोक्याला लावली जात आहे. दुखणं थांबवायच असेल तर योग्य ठिकाणी औषधोपचार होणे आवश्यक आहे. आरक्षण नोकरी शिक्षण यावर एकच उपाय आहे. खाजगीकरण विरोधात आवाज उठवून बँलेट पेपर वर निवडून घेण्याचा आग्रह धरणे. एवढे जरी केले तरी अर्ध्या समस्या ताबडतोब निकाली लागु शकतात. फक्त दुखणं आणि औषध याचा ताळमेळ बसवता आला पाहिजे.

# विनम्रता हे ज्ञानाचे सर्वोच्च शिखर



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

आधुनिक केसरी

**ज्ञान किती आहे हे समजण्यासाठी विनम्रता किती आहे हेच पाहिलं जातं. म्हणून विनम्रता हे ज्ञानाच सर्वोच्च शिखर आहे. शक्यतो झाडाला रूचकर आणि स्वादिष्ट फळ यावीत म्हणून आपण झाडाच संगोपन करतो. विनम्रता हे ज्ञान रूपी झाडाचं रूचकर फळ असतं. आचरण कस आहे यावर ज्ञान किती आहे हे ठरत असत.ज्ञान हे कधीच वाचन लेखन, यावर ठरत नाही किती पुस्तकं वाचली किती शिक्षण घेतलं किती पदव्या मिळवल्या यावर कोणी ज्ञानी ठरत नाही. याचा प्रत्यय अनुभव घेयचा असेल तर काही वर्ष मागे जावा लागेल जेव्हा शाळा नव्हत्या शिक्षणाच्या फार सुविधा उपलब्ध नव्हत्या. शिक्षण हे गुरू परंपरेच्या माध्यमातील समर्पित भावनेने होत .**

तिथं नम्रता हि वास करून होती. आणि जशी जशी नम्रता कमी होत चालली आहे तसं तसं पुस्तिका ज्ञान साठा नक्कीच वाढीस लागला आहे पण पुस्तकी ज्ञान साठा म्हणजे ज्ञान होऊ शकत नाही तो फक्त महिती साठा आहे.स्वतः च स्वतः ला ज्ञानी समजणं वेगळं आणि इतरांनी आपल्याला ज्ञानी समजणं वेगळं म्हणजे ज्ञान आणि नम्रता ह्या एका नाण्याच्या दोन बाजू आहेत आणि दोन्ही बाजु शिवाय नाण पुर्ण होत नाही.आणि दोन्ही बाजु सम प्रमाणात असल्याचं पाहिजे ज्ञानी हा नम्र असलाच पाहिजे हा नैसर्गिक संकेत आहे.जीवनातील अर्जित केलेले ज्ञान हे जर आपल्या वास्तविक जीवनात नम्रता वाढीसाठी कामी येत नसेल तर ते अर्जित केलेले ज्ञान नसुन फक्त माहितीचा साठा आहे .अति प्रचंड माहिती साठा असणं म्हणजे ज्ञानी असणं असं मुळीच होत नाही. ज्ञान हे विश्वातील सगळ्यात मोठी शक्ती संपत्ती आहे.पण ज्ञान असणं वेगळं आणि महिती साठा असणं वेगळं तसं पाहिलं तर महितीसाठा आणि ज्ञान या मध्ये जमिन असमानाच अंतर आहे ज्ञान पुर्व आहे तर माहिती साठा पश्चिम आहे महिती साठयाने ज्ञानी होता येत नाही ज्ञानी होण्यासाठी उत्तम गुणांसह नम्रता अंगीकारणे खुप आवश्यक आहे .ज्ञान म्हणजे नम्रतेचा सागर आणि या सागरा मध्ये आपला प्रवास कुठपर्यंत पोहचला आहे त्यानुसार आपली ज्ञान उंची समजते .जीवनाच्या अनुषंगाने प्रत्येकाच एक वेगळं असं वैशिष्ट्य पुर्ण मत असतं पण ते वास्तविक जीवनात कोणीही सहजासहजी मान्य करत नाही.मुळात आपण जीवनात ज्ञान अर्जित करतो ते आपल्या मध्ये नम्रता वाढीस लागली पाहिजे आणि शेवटच्या



क्षणी आपण नम्र आति नम्र झालो पाहिजे यासाठीच पण असं खरंच होतं का तर अगदी अगदी तुरळक प्रमाणात हि स्थिती जाणवते म्हणजे काय तर एकंदरीत जीवन हेच आपल्याला नम्र बनविण्यासाठी असत पण आपण ज्ञान अर्जित करून नम्र होत नाही हि किती उलटपक्षी स्थिती आहे.आणि अशी उलटपक्षी स्थिती निर्माण झाली कि मग ते जे काही आपण शिकलो अर्जित केले ते फक्त आणि फक्त एक माहितीसाठा म्हणून नोंद घेण्यासाठी पुर आहे .पण वास्तविक नम्रता हा जीवनातील अनमोल अंलकार आहे .जसं जसं आपलं ज्ञान वाढिस लागेल तस तसं दिवसेंदिवस आपली नम्रता हि वाढलीच पाहिजे आणि जर वाढलीतर मग हेच आपल्याला जीवनातील वास्तविक ज्ञान आहे .दैनंदिन जीवनात सात्विक जीवनशैली अंवलब झाला तर मग मात्र आपण ओपाआप ज्ञान मार्गावर मार्गक्रमण करत नम्रता वाढीस लागते आणि आणि नम्रता जशी जशी वाढीस लागते तसं तसं ज्ञानाचा विकास होतो .जितकी नम्रता जास्त तितक ज्ञान जास्त म्हणून जीवनात अहोरात्र पराकोटीची नम्रता वाढविण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत .नम्रता हिच आयुष्यातील सर्वात मोठी संपदा आहे. आणि खरया अर्थाने ज्ञान असल्याचं वास्तविक स्वरूप आहे. जीवनाचा आरंभ पासुन शेवटच्या क्षणापर्यंत अंहकार संपुष्टात येऊन विनम्रतेचे पिक बहरले पाहिजे मान अपमान सन्मान या पालिकड जाऊन विनम्र होणं स्वाभाविक रित्या जीवनातील सर्व श्रेष्ठ असं हित आहे आणि हेच हित साध्य होण अथवा साधलं जाण हा जीवनातील प्रमुख यशाचा भाग आहे.जीवन कल्याण करणार हित साधल जावं म्हणून सदैव विनम्र रहता आलं पाहिजे. विनम्रता हि अवस्था ज्ञानाच परमोच्च शिखर आहे आणि हेच शिखर जीवनात सर करता आलं पाहिजे.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# नालीचे काम निकृष्ट; दर्जाचे पावसाने पितळ उघडे

## शासनाच्या पैशांचा दुरुपयोग : बोगस पद्धतीने नालीचे बांधकाम

आधुनिक केसरी न्यूज

**रमेश दणके**

**वडोद बाजार :** येथे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वतीने सिमेंट रस्त्याचे काम करण्यात आले या सिमेंट रस्त्याच्या कामाला सार्वजनिक बांधकाम विभागाकडून एक कोटी रुपयांच्या जवळपास निधी प्राप्त झाला होता. सिमेंट रस्त्याचे काम तीन महिन्यापर्यंत चालले त्यानंतर सिमेंट रस्त्याच्या बाजूला 100 मीटरच्या जवळपास सिमेंट नालीचे काम महिनाभर पूर्वी करण्यात आले होते. वडोद बाजार येथे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वतीने शाखा अभियंता साहेबराव जाधव यांनी या कामावर लक्ष देणे गरजेचे असतानाही दुर्लक्ष केले तर ठेकेदाराने त्याच्या मनमानी पद्धतीने या रस्त्याचे काम व नालीचे काम निकृष्ट दर्जाचे केले असून अल्पशा पावसातच हि नाली ढासळली आहे. शासनाच्या पैशाचा दुरुपयोग करून बोगस पद्धतीने नालीचे बांधकाम करण्यात आले. त्यामुळे अल्पशा पावसातच नाली ढासळली वडोद बाजार येथील जाधव हे सार्वजनिक बांधकाम विभागात शाखा अभियंता असून त्यांच्याच गावात सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वतीने सुरू असलेल्या कामाचे बोगस पद्धतीने काम करण्यात आले. यामुळे आश्चर्य व्यक्त केले जात आहे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी ही या कामाकडे लक्ष देणे गरजेचे असतानाही त्यांनीही दुर्लक्ष केले ठेकेदार त्याच्या मनमानी पद्धतीने बोगस काम केले असून या सिमेंट नालीचा काही भाग ढसाळला असून इतर ठिकाणीही तडे गेले आहे तर वडोद बाजार येथील पुलाजवळ सिमेंट रस्त्याला उंच केल्यामुळे वाहतुकीचा अडथळा निर्माण होत आहे पुलाच्या ठिकाणी वळण रस्ता असून त्या ठिकाणी सिमेंट रस्ता हा एकदम उंच झाल्याने वाहनधारकांना



वाहन चालवताना कसरत करावी लागत आहे. भविष्यात या ठिकाणी मोठा अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. या सिमेंट रस्त्याकडे वेळेच लक्ष देण्याची गरज होती दुर्लक्ष केल्यामुळे ठेकेदाराने त्याच्या मनमानी पद्धतीने नालीचे काम बोगस केले आहे.

# कन्नड तालुक्यातील नुकसानीची संजना जाधव यांच्याकडून पाहणी

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** तालुक्यात रविवारी रात्री सर्वत्र विजाच्या कडकडासह जोरदार पाऊस पडल्याने शेतकऱ्याच्या हाता तोंडाशी आलेला घास हिरावुन घेतल्याने शेतकरी चिंता ग्रहस्थ दिसुन येत आहे संजनाताई जाधव यांनी शेतकऱ्यांच्या शेतावर जाऊन नुकसान झालेल्या पिकाची पाहणी करून शेतकऱ्यांना धीर दिला आहे. तालुक्यातील आठ महसुल मंडळापैकी दोन महसुल मंडळात अतिवृष्टी झाली. या अवकाळी पावसाने कापुस, मका, उस इत्यादी पिकाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाल्याने शेतकऱ्यांच्या तोंडातील घास हिरावला गेला आहे. या अवकाळी पावसाचा रब्बी पिकाना फायदा होणार असला तरी कापुस, मका पिकाचे नुकसान झाले आहे. विज पडून जिवित हानी झाली नसली तरी रविवारी संध्याकाळी साडेसात वाजता सुरु झालेला अवकाळी पाऊस रात्रभर कमी अधिक प्रमाणात कोसळतच होता. वादळ असल्याने वारंवार विजपुरवठा खंडीत होत होती. तालुक्यातील शेतकऱ्यांच्या शेतात जाऊन संजनाताई जाधव यांनी पाहणी केली आहे.



# नारेगावातील 19 वीजचोरांवर गुन्हा

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** नारेगाव परिसरातील विविध वसाहतींत महावितरणने वीजचोरीविरोधात धडक मोहीम राबवत एकाचवेळी 19 जणांवर गुन्हा दाखल केला आहे. या कारवाईमुळे वीजचोरांमध्ये खळबळ उडाली आहे. नारेगाव परिसरात काही ग्राहक मीटरमध्ये फेरफार करून तसेच लघुदाब वाहिनीवर आकडे टाकून वीजचोरी करीत असल्याची माहिती महावितरणला मिळाली. यावरून चिकलठाणा एमआयडीसी शाखेचे सहायक अभियंता सतीश अधाने, वरिष्ठ तंत्रज्ञ विनोद तित्तर, प्रेमचंद चव्हाण, अकिल पठाण व विद्युत सहायक आय.एल.शेख यांनी 17 ते 22 नोव्हेंबरदरम्यान तपासणी मोहीम राबवली. त्यात आयेशा कॉलनीतील अब्दुल जब्बार शेख, रफिक पटेल (वापरकर्ता सय्यद इम्रान अकिल), रंगरेज इश्तिकुए पीर मोहंमद, आयेशा मशिदीजवळील मुन्नीबी अब्दुल गफार शेख, मोहंमद फारूख शेख इस्माईल, चमचमनगरमधील फारूख इस्माईल शेख, अजीज कॉलनीतील इम्रान मोहंमद खिझर, अमीर रहेमान शेख, साहिबा बेगम हसन चाऊस, नारेगावातील सलमान सलीम खान, मुसा इब्राहीम शेख, अख्तारी बेगम खान, अमिना पार्कमधील मोहंमद सादिक जफर, रुमाना परवीन अफरोज खान, इम्रान रफिक शेख, मुमताज बेगम शब्बीर शेख, अस्लम पार्कमधील कासिम रज्जाक शेख, अन्वर जानी मशिदीजवळील सय्यद जावेद बशीर व असिफ कॉलनीतील सय्यद शफिक कैसर हे 19 जण हे वीजचोरी करताना आढळून आले.

या सर्वांनी घरगुती वापरासाठी विद्युत वाहिनीवर आकडे टाकून 1 लाख 14 हजार रुपयांची वीजचोरी केली. या रकमेसह सर्वांना प्रत्येकी 2 हजारांप्रमाणे 38 हजारांचे तडजोड शुल्हकी भरावे लागणार आहे. या प्रकरणी सहायक अभियंता सतीश अधाने यांच्या फिर्यादीवरून 19 जणांवर सिडको पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# सकल धनगर समाजाचा रस्ता रोको : तहसीलदारांना निवेदन





आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** येथे सकल धनगर समाजाने रस्ता रोको करुन विविध मागण्या व त्यावर अंमलबजावणी करण्याची निवेदन मा.तहसीलदार यांच्याकडे सादर करण्यात आले. सकल धनगर समाजाला एसटी मधे आरक्षणची अंमलबजावणी करणे, हरसुल टी पॉईटवर पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या स्मारकासाठी जागा,वस्तीगृहाचे काम तातडीने सुरु करा,मेंढपाळाना वनक्षेत्राची पास व विमा, अहमदनगर जिल्ह्यांचे नाव अहिल्याबाई होळकर नगर करणे व त्याचे प्रपत्रक काढणे, यशवंतराव होळकर महामंडळ व शेळी मेंढी महामंडळ भरीव निधी उपलब्ध करून देणे,सकल धनगर समाजाच्या उद्योजकासाठी निधी उपलब्ध करून देणे व अन्य इतर मागण्यासाठी दि.२८ रोजी रस्ता रोको करुन तहसीलदार खुलताबाद यांना निवेदन देण्यात आले व तातडीने अंमलबजावणी करण्याची मागणी करण्यात आली.रस्तारोको साठी तालुक्यातील ठिकठिकाणचे सकल धनगर समाजाचे नागरिक पदाधिकारी कार्यकर्ते तथा किशोर कुकलारे, शाम कोतकर, संजय फटाकडे, नाना दुधारे, नवनाथ लवंगे, संतोष वाघमारे, चंद्रभान फटाकडे,रायभान वेदे सह मोठ्या संख्येने सकल धनगर समाजाचे नागरिक उपस्थित होते.

महाराष्ट्र Business Katta









# चीनमध्ये श्वसनाचा एक मोठा आजार का उद्भवतो?



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

आधुनिक केसरी

**चीनमध्ये दर काही वर्षांनी श्वसनाचा एक मोठा आजार का उद्भवतो आणि पसरतो? चीनमध्ये दर काही वर्षांनी श्वासोच्छवासाच्या आजाराच्या संसर्गाचा प्रसार का होतो:?चिनी रुग्णालयांमध्ये श्वसनाच्या आजाराच्या प्रकरणांमध्ये झपाट्याने होणारी वाढ ही चीनमध्ये दर काही वर्षांनी श्वासोच्छवासाच्या संसर्गाचा प्रसार होत असल्याची आठवण करून देते. या वेळी संसर्ग पसरण्याचे कारण अगदी सामान्य असल्याचे सांगितले जात असले तरी, चीनमध्ये दर काही वर्षांनी श्वसनक्रिया बंद पडणे का पसरते हे समजून घेणे आवश्यक आहे. चीनमध्ये दर तीन ते चार वर्षांनी श्वसन संक्रमणाचा प्रसार होतो. अलीकडे, चीनमध्ये श्वसनाच्या आजारांच्या घटनांमध्ये झपाट्याने वाढ झाल्याने चिंतेचे वातावरण आहे. यामुळे लोकांना कोविड-19 च्या सुरुवातीच्या टप्प्याची आठवण होऊ लागली जेव्हा ही महामारी पसरली.**

चीनमध्ये दर काही वर्षांनी असे संक्रमण पसरत असल्याचे दिसून येते.

चीनमध्ये एक "गूढ" श्वसन रोग पसरत आहे, ज्यावर जागतिक आरोग्य संघटनेने अलीकडे काही प्रश्न विचारले आहेत. त्याच वेळी, चीनने अधिकृतपणे स्पष्ट केले आहे की या आजारामध्ये कोणताही नवीन किंवा असामान्य रोगकारक नाही ज्यामुळे चिंता करावी. आता जागतिक आरोग्य संघटनेनेही तेच सांगितले आहे. परंतु हे लक्षात घेण्यासारखे आहे की दर तीन-चार वर्षांनी चीनमध्ये काही प्रकारचे श्वसन संक्रमण होते. यामध्ये कोविड 19 च्या SARS COV-2 चा देखील समावेश आहे. कोरोना विषाणूच्या पूर्वीच्या आवृत्त्या चीनमध्ये किंवा आसपास पसरल्या होत्या. पण चीनमध्ये असे काय आहे ज्यामुळे दर काही वर्षांनी श्वसनाचे आजार पसरतात?

श्वसनाच्या आजारांच्या रुग्णांमध्ये अचानक वाढ झाली. अलीकडेच मीडिया रिपोर्ट्समध्ये असे सांगण्यात येत होते की, चीनमध्ये हिवाळा सुरू झाल्याने श्वसनाच्या आजारांमध्ये अचानक वाढ होत आहे, तर गेल्या वर्षी डिसेंबरमध्येच त्यांनी कोविडशी संबंधित निर्बंध पूर्ण केले होते.

रॉयटर्सच्या म्हणण्यानुसार, प्रकरणांमध्ये नुकत्याच झालेल्या वाढीमुळे बीजिंग आणि लिओनिंग प्रांतांसारख्या देशाच्या उत्तरेकडील भागातील रूग्णालयांमध्ये गर्दी वाढली आहे, ज्यात बहुतेक मुले आहेत. हा एक सामान्य संसर्ग आहे का?

अचानक वाढलेल्या संसर्गामुळे, कोविड 19 किंवा त्याच्यासारखा काही नवीन धोकादायक संसर्ग आला आहे की नाही याची सर्वत्र चिंतेची लाट होती. या ट्रेंडचे कारण अधिकृतपणे स्पष्ट केले गेले नसले तरी, काही तज्ञांचे मत आहे की हे सामान्य आहे आणि लॉकडाउन निर्बंध उठवल्यानंतर तात्पुरते परिणाम मानले जाऊ शकते.

चीनमध्ये बहुतेक मृत्यू, स्ट्रोक आणि हृदयविकारानंतर, श्वसनाच्या गंभीर आजारांमुळे होतात. त्याच वेळी, चीन हा अशा देशांपैकी एक आहे जिथे उन्हाळा आणि हिवाळा खूप जास्त असतो. उत्तर ध्रुव आणि सायबेरियातून येणाऱ्या बर्फाळ वाऱ्यांचा थेट परिणाम येथील हिवाळ्यावर होतो, त्यामुळे हिवाळ्यात श्वसनाचे आजार पसरण्यासाठी आदर्श परिस्थिती निर्माण होते. मात्र, त्याचा आहार आणि जीवनशैलीशीही खोलवर संबंध आहे.



अचानक प्रकरणे का वाढली?

यावेळी संसर्ग पसरण्याच्या कारणाबाबत, चीनच्या राष्ट्रीय आरोग्य आयोगाच्या अधिकाऱ्यांनी पत्रकार परिषदेत सांगितले की, ऑक्टोबरच्या मध्यापासून चीनमध्ये श्वसन संक्रमणाची प्रकरणे वाढली आहेत. कोविड-19 निर्बंध उठवल्यानंतर ज्ञात संसर्गजन्य रोगजनकांचा प्रसार, ही एक प्रकारे सामान्य गोष्ट असल्याचे त्यांनी कारण सांगितले. चीनमध्ये हिवाळा आणि उन्हाळी हंगामात असे बदल होतात की हिवाळ्यात संसर्गजन्य रोग पसरण्याची शक्यता असते.

यावेळी संसर्ग का पसरला? तज्ज्ञांचे म्हणणे आहे की चीनमध्ये अशी अनेक मुले आहेत जी पहिल्यांदाच मोकळ्या हवामानाचा सामना करत आहेत, त्यामुळे त्यांच्यात संसर्गजन्य रोगांविरूद्ध कोणत्याही प्रकारची प्रतिकारशक्ती नाही. त्याच वेळी, काही काळ लॉकडाऊनमध्ये राहिल्यानंतर, अनेक लोकांची प्रतिकारशक्ती कमी झाली असती, त्यामुळे अशा संसर्गाचा प्रसार होणे आश्चर्यकारक नाही.

या हिवाळ्यात इन्फ्लूएंझा आणि मायकोप्लाझ्मा न्यूमोनियाचा संसर्ग पसरू शकतो आणि कोविड-19 संसर्ग पुन्हा पसरू शकतो हे नाकारता येत नाही, असे अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे. त्यामुळे आरोग्य सेवेसोबतच लोकांना सतर्क राहण्यास आणि माहितीने सुसज्ज राहण्यास सांगण्यात आले आहे.

चीनमधील मुलांमध्ये निमोनियाच्या आजारांचा फायदा झाल्याचे पुढे आल्यानंतर भारत सरकारच्या केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने राज्यांना आरोग्य सजेतेचा तात्काळ आढावा घेण्याचा सल्ला दिला आहे सध्याचा आणि हिवाळी हंगाम लक्षात घेता श्वसनाच्या आजाराचे प्रमाण वाढण्याची भीती आहे.

# मद्यपान करून गाड्या चालवणे धोकादायक



बुद्धभूषण चं. कांबळे
संपर्क क्र. 7498715661

आधुनिक केसरी

**आजकाल आपण सर्वजण पाहातोय की, मद्यपान करून गाड्या चालवण्याचे प्रमाण वेगाने फोफावले आहे.म्हणजेच आजघडीला मद्य प्राशन करून गाड्या चालवणे ही एक आता नवीन फॅशन झाली आहे. बहुतांश ड्रायव्हर हे मद्यपान केल्याशिवाय गाडीची टेअरिंग सुद्धा हातात घेत नाहीत.पण काही निर्व्यसनी ड्रायव्हर सुध्दा आहेत.जे की बगर नशेत राहून आणि डोळ्यात तेल घालून गाड्या चालवतात.पण तेही बोटावर मोजण्याइतकेच आहेत.अशा निर्व्यसनी चालकांना माझा मनापासून सलाम आहे.हल्ली घरोघरी एकापेक्षा एक भारी भारी किंमतीच्या गाड्या आहेत.**

त्या गाड्या हाताळायला आमचा युवा वर्ग आघाडीवर आहे. परंतु आजचे तरुण युवक पुरते व्यसनाधीन झाल्यामूळे नशेत बेभान होऊन गाड्या चालवत आहेत. किती वेगाने गाड्या चालवाव्यात याचे भान आमच्या युवा पिढीला राहिले नसल्यामुळे अपघाताचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत जात आहे. दररोज कुठे ना कुठे तरी अपघात होतातच. दररोज वर्तमानपत्रात अपघाताच्या कितीतरी बातम्या छापून येत आहेत.ही आपल्यासाठी अतिशय खेदाची व चिंताजनक बाब म्हणावी लागेल.खरेतर मद्यपींचा खरा धोका व त्रास हा निर्व्यसनी व सज्जन चालकांना होत आहे.ते बिचारे आपल्या एका साईटने डोळ्यात तेल घालून दक्षतेने वाहने चालवत असतात परंतु हे मद्यपी बेभानपणे व सुसाट वेगाने येऊन अचानक त्यांना धडकतात. तेव्हा दोन्ही चालकांना व प्रवाशांना जबर मारहाण होते. काही प्रवाशी सुखरूप बचावतात तर काहींना कायमचे प्राणाशी मुकावे लागते. निष्पाप निर्व्यसनी चालकांचा व प्रवाशांचा नाहक बळी जातो. तेव्हा हे अपघाताचे वाढते प्रमाण कुठेतरी थांबले पाहिजे. त्यासाठी गाड्या चालवताना मनामध्ये थोडी भीती बाळगून व निर्व्यसनी राहून आणि रोड नियमांचे पालन करूनच गाड्या चालवाव्यात आणि मनावर ब्रेक उत्तम ब्रेक हे ब्रीद वाक्य कायम ध्यानात ठेवावे. म्हणजे अपघाताचे हे वाढते प्रमाण कमी होईल. तेव्हा समस्त मद्यपी चालकांना माझी कळकळीची नम्र विनंती आहे की, बांधवांनो मद्यपान करून गाड्या चालवू नका आणि गाड्या चालवताना जरा शिस्तीत व रोड नियमांचे पालन करूनच गाड्या चालवा.विनाकारण गाडीचा वेग वाढवून स्वतःचे व दुसऱ्यांचे जीवन धोक्यात घालू नका.अति घाई संकटात नेई हे वाक्य नेहमी ध्यानात ठेवा.मानवी जीवन हे निसर्गाने दिलेली अनमोल देणगी आहे. तेव्हा हे जीवन मस्त,मजेत व आनंदाने जगा. विनाकारण जीवाशी खेळणे टाळा... सार्वजनिक ठिकाणी वाहन चालविताना रक्तातील अल्कोहोलचे प्रमाण 30 मि. ग्रॅ. किंवा त्यापेक्षा जास्त असल्यासच मद्यपीवर गुन्हा दाखल केला जाऊ शकतो, असा आतापर्यंत नियम आहे. मात्र, मद्यपान करून वाहन चालविण्याचे आणि त्यामुळे निष्पाप लोकांचा विनाकारण मृत्यू होण्याचे प्रमाण वाढते आहे.

# एक विख्यात भारतीय उद्योजक!



श्रीकृष्णदास
निरंकारी (बापू)
संपर्क क्र. 9423714883

आधुनिक केसरी

**जहांगीर रतनजी दादाभॉय टाटा उर्फ जे.आर.डी.टाटा हे भारतीय उद्योजक होते. ते पहिले भारतीय वैमानिक असून भारतातील विमान वाहतूक उद्योगाचे जनक मानले जातात. जेआरडींना त्यांच्या हयातीत अनेक पुरस्कार मिळाले. भारतीय केंद्रशासनातर्फे त्यांना इ.स.१९५७ साली पद्मविभूषण पुरस्काराने गौरवण्यात आले, तर इ.स.१९९२ साली त्यांना भारतरत्न या भारतातील सर्वोच्च नागरी सन्मानाने भूषवण्यात आले. सन २०१२मध्ये झालेल्या आऊटलुक इंडियाच्या दी ग्रेटेस्ट इंडियन या आंतरराष्ट्रीय सर्वेक्षणामध्ये टाटा सहाव्या क्रमांकावर होते.**

त्यांच्या कार्याची रोचक माहिती श्री एन. के. कुमार जी. गुरुजींच्या सदर लेखात अवश्यच वाचा....

प्रथम थोडक्यात कर्तबगार टाटा घराण्याचा इतिहास जाणू या. भारतातील लोखंड व पोलाद उद्योगाचा पाया घालणारे, तसेच भारताच्या औद्योगिक प्रगतीकरिता कापडगिरण्या, जलविद्युत् प्रकल्प उभारणारे जगप्रसिद्ध कारखानदार, व्यापारी, दानशूर व देशभक्त असे टाटा घराणे. टाटा उद्योगसमूहाचे संस्थापक जमशेटजी नसरवानजी होते. त्यांचे दोन सुपुत्र सर दोराबजी व सर रतनजी.

जमशेटजींचे पुतणे जहांगीर रतनजी दादाभाई- जेआरडी हे या घराण्यातील धडाडीचे, कल्पक व दीर्घोद्योगी असे कर्ते पुरुष होत. एकाच घराण्यातील तीन कर्तबगार पिढ्यांनी घडवून आणलेला देशाचा प्रचंड औद्योगिक विकास, ही एक अनन्यसाधारण वस्तुस्थिती होय. टाटा घराण्याचे कर्तबगार चतुष्टय संस्थापक जमशेटजी, दोराबाजी, रतनजी व जेआरडी हे होत. टाटा उद्योगाचे आद्य प्रवर्तक जमशेटजी नसरवानजी कार्यकाळ ३ मार्च १८३९-१९ मे १९०४ यांचा जन्म गुजरात राज्यातील नवसारी येथे एका पारशी घराण्यात झाला. त्यांच्या वडिलांची मुंबईत व्यापारी पेढी होती. वयाच्या तेराव्या वर्षी ते शिक्षणासाठी मुंबईस आले. १८५६-५८ या काळात त्यांनी एल्फिन्स्टन कॉलेजमधून शिक्षण घेतले. रामकृष्ण गोपाळ भांडारकर व दिनशा वाच्छा हे त्यांचे सहाध्यायी होते. सन १८५८मध्ये ते एल्फिन्स्टनमधून ग्रीन स्कॉलर- पदवीप्राप्त म्हणून उत्तीर्ण झाले. विद्यार्थीदशेत असतानाच त्यांचा करसेटजी डाबू या पारशी गृहस्थांच्या हीराबाई या कन्येशी विवाह झाला. दोराबजी व रतनजी हे त्यांचे पुत्र. सन १८५९मध्ये जमशेटजी आपल्या वडिलांच्या व्यवसायात शिरले. याच सुमारास हाँगकाँगच्या जमशेटजी अँड अर्देशिर या शाखेच्या व्यवहारात लक्ष घालण्यासाठी त्यांना तेथे पाठविण्यात आले. तेथूनच पुढे ते शांघायला गेले व तेथे त्यांनी दुसरी शाखा उघडली. सन १८६५मध्ये यंत्रविद्येचे ज्ञान मिळविण्यासाठी ते मँचेस्टरला गेले. इंग्लंडमध्ये ते चार वर्षे होते. स्वदेशी परतल्यावर त्यांनी मुंबईच्या चिंचपोकळी भागातील दिवाळे निघालेली एक तेलगिरणी विकत घेऊन तिचे कापडगिरणीत रूपांतर केले. तिचे ॲलेक्झांड्रा मिल असे नामकरण करून त्यांनी आपल्या औद्योगिक कारकीर्दीस प्रारंभ केला. या पहिल्याच उपक्रमामुळे त्यांना कीर्ती व संपत्ती या दोहोंचाही लाभ झाला. त्यांनी ही भरभराटीस आणलेली गिरणी विकून टाकली. यानंतर मोठ्या आकारामानाची कापडगिरणी स्थापण्याचा संकल्प सोडून ते कापडउद्योगाचे अधिक शास्त्रशुद्ध ज्ञान मिळविण्याकरिता पुन्हा इंग्लंडला गेले. तेथे फिरोजशहा मेहतांशी त्यांचा घनिष्ठ स्नेह जडला. सन १८७४मध्ये भारतात परतल्यावर अनेक मित्रांचा विरोध असूनही जमशेटजींनी मुंबईऐवजी नागपूर येथे एम्प्रेस मिल्स ही कापडगिरणी सुरू केली. एम्प्रेस मिल्सच्या स्थापनेपासूनच त्यांनी कामगारकल्याण योजना कार्यान्वित केल्या. कुर्ला येथील धरमसी मिल ही जुनी गिरणी विकत घेऊन तिचे स्वदेशी मिल्समध्ये रूपांतर केले व कापडधंद्याचा विस्तार केला. त्याच वर्षी त्यांनी अहमदाबाद येथील ॲडव्हान्स मिल्स ही कापडगिरणी भरभराटीस आणली. स्वदेशी मिल्स या गिरणीच्या रूपाने त्यांची स्वदेशी चळवळीबद्दल वाटणारी आस्था प्रकट झाली, तर ॲडव्हान्स मिल्सच्या रूपाने त्यांचा कापडउद्योगातील आधुनिकीकरणाचा दृष्टिकोन दिसून आला. भारतीय कापडउद्योगाचे आधुनिकीकरण करण्याचे श्रेय जमशेटजींना द्यावे लागते. त्याच्याच अनुषंगाने भारतात लांब धाग्याच्या कापूस उत्पादनासही त्यांनी प्रयत्न केले. जमशेटजींनी आपल्या औद्योगिक ध्येयवादात स्वदेशाच्या आणि स्वकीयांच्या गरजांची जाणीव सतत राखली होती. त्यांनी दूरदृष्टीने टाटा सन्स लि. या संस्थेची स्थापना करून तिच्याकडे आपल्या सर्व कंपन्यांचे व्यवस्थापन सोपविले. या संस्थेचे ८५ टक्के भांडवल टाटा कुटुंबातील मंडळींनी उभारलेल्या धर्मादाय न्यासांच्या मालकीचे असल्याने टाटा उद्योगसमूहातील विविध उद्योगांना आणि संस्थांना होणारा फायदा न्यासांकडे म्हणजे पर्यायाने जनतेकडे पोहोचविला जातो. भारतातील आधुनिक उद्योगधंद्यांचे प्रवर्तन जमशेटजींनी केले. इतर पुढारलेल्या राष्ट्रांच्या बरोबरीने जर हिंदुस्थानला जावयाचे असेल, तर त्याचे औद्योगिक कार्यक्षेत्र विस्तृत झाले पाहिजे हिंदुस्थानची भौतिक उन्नती होण्याचा शक्य कोटीत असणारा मार्ग हाच आहे, अशी त्यांची दृढ श्रद्धा होती. व्यवहारी दृष्टीबरोबरच कल्पकता, उपक्रमशीलता, समयोचितता, धाडसीपणा आणि निकोप व्यापारी दृष्टी ह्या गुणांमुळेच जमशेटजींना अपार यश लाभले. रूढ धंद्यांपेक्षा नवेनवे औद्योगिक क्षेत्र शोधण्याकडे त्यांचा कटाक्ष असे. राष्ट्रीय व आर्थिक पारतंत्र्याच्या काळात स्वदेशीच्या संकल्पनेला सिद्धीचे रूप देण्यात, देशातील नैसर्गिक साधनसामग्रीच्या शोधाकरीता व विकासाकरिता प्रचंड श्रम घेण्यात आणि वैज्ञानिक अन्वेषणाची प्रेरणा देण्यात जमशेटजी टाटा हे अग्रभागी होते. देशातील खनिजसंपत्तीचा शोध व विकास हा देशातील लोकांनीच देशी भांडवलाच्या साहाय्याने घडवून आणला पाहिजे, या मतावर त्यांचा पूर्ण विश्वास होता. यशस्वी उद्योगपती तसेच व्यापारी असूनही त्यांचे औदार्य व दानशूरत्व अनन्यसाधारण होते. औद्योगिक क्रांतीच्या काही अनिष्ट परिणामांचेही त्यांना यथार्थ भान होते. त्यांपासून आपल्या कारखान्यांतील कामगारांना वाचविण्यासाठी कामगार-कल्याणाच्या अनेक योजना त्यांनी अंमलात आणल्या. ग्रंथ वाचणे व टिपणे काढणे, हा त्यांचा आवडता छंद होता. त्यांच्या सर्व लहानमोठ्या औद्योगिक प्रकल्पांना त्या त्या उद्योगधंद्यातील अद्ययावत ज्ञानाचे अधिष्ठान होते. नाउहाइम- प.जर्मनी येथे वयाच्या पासष्टाव्या वर्षी या महान उद्योगपतीचे निधन झाले. त्यांच्या पश्चात सर दोराबजी व सर रतनजी या त्यांच्या दोन मुलांनी वडिलांची परंपरा यशस्वीपणे पुढे चालविली. सर रतनजींचे पुत्र जेआरडी होत.

जे.आर.डी.टाटांचा जन्म दि.२९ जुलै १९०४ रोजी पॅरिस, फ्रान्स येथे झाला. रतनजी दादाभॉय टाटांचे ते दुसरे पुत्र होते. मुंबईतील कॅथेड्रल अँड जॉन केनॉन स्कूल येथे काही वर्ष ते शिकले, पण टाटांची आई फ्रेंच असल्यामुळे त्यांचे बालपण मुख्यतः फ्रान्समध्येच गेले. काही कारणाने ते मॅट्रीक परीक्षेनंतर शिकू शकले नाहीत. इंग्लिश खाडी विमानाद्वारे पहिल्यांदा पार करणारे सुप्रसिद्ध फ्रेंच वैमानिक लुईस ब्लेरिअट यांच्या जीवनकार्याने जेआरडी खूप प्रभावित झाले होते. त्यामुळे त्यांनीही विमान शिकण्याचा ध्यास घेतला. इ.स.१९२९ साली त्यांनी वैमानिकाचा परवाना मिळवला. वैमानिकाचा परवाना मिळवणारे ते पहिले भारतीय ठरले. इ.स.१९३२ साली त्यांनी टाटा एरलाईन्स या पहिल्या भारतीय प्रवासी विमान वाहतूक कंपनीची स्थापना केली. पुढे इ.स.१९४६ साली तिचे नाव बदलून एर इंडिया ठेवले गेले. वयाच्या अवघ्या ३४व्या वर्षी म्हणजे इ.स.१९३८ साली ते टाटा सन्स उद्योगसमूहाचे चेअरमन बनले. ते प्रदीर्घ काळ त्या पदावर होते. त्यांनी पदभार सांभाळला तेव्हा टाटा सन्स उद्योगसमूहाच्या १४ कंपन्या होत्या. टाटांच्या काळात ९१ कंपन्यांची भर पडली. रसायन, वाहन, चहा, माहिती, हॉटेल आणि तंत्रज्ञान अशा नवीन क्षेत्रांत त्यांनी टाटा उद्योगसमूहाचा विस्तार केला. त्यांच्या पुढाकाराने इ.स.१९५६ साली कंपनीतील कामगारांच्या कल्याणासाठी खास योजना राबविण्यात आली. त्यामध्ये दिवसातून आठ तास काम, मोफत आरोग्यसेवा, भविष्य निर्वाह निधी आणि अपघात विमा योजना अशा पायाभूत गोष्टींचा समावेश करण्यात आला होता.

# प्रांजळ लेखणीतून साकारलेले अनुभवचित्र



अस्मिता प्रदीप येंडे
संपर्क क्र. 9619035195

आधुनिक केसरी

**जीवनाच्या लाटांवरुन प्रवास करत असताना अनेक संकटे येत असतात आणि तीच संकटे आपल्या आतील क्षमतांची ओळख करून देतात. समाजात वावरताना आजुबाजुला अनेकांगी व्यक्तिमत्त्व आपल्याला भेटत असतात आणि त्यातूनच आपल्याला अनुभव येत जातात. अनुभवासारखा दुसरा शिक्षक नाही.प्राप्त परिस्थितीनुसार माणूस जगायला शिकतो. फूल म्हणजे निसर्गाचे सगळ्यात सुंदर निर्मिती. अत्यंत अल्प जीवन मिळाले असले तरी प्राप्त जीवनात सगळ्यांना फक्त सुगंध प्रदान करत राहणं , हा फुलांचा गुणधर्म मानवी जीवनात रुजवायला हवे नाही का ? काही काळाने फूल जरी कोमेजून गेले तरी आपल्या जीवनातील महत्त्वपूर्ण क्षणात त्या फुलांनी दिलेले आनंद अविस्मरणीय असतो.**

या फुलांप्रमाणे अशा काही व्यक्ती आपल्याआ भेटत असतात, ज्या आपल्याला आनंदासोबत एक आठवण देऊन जातात. लेखक अनिल पाटील यांचे ' बकुळ फुले 'हा लेखसंग्रह वाचल्यावर मला हेच जाणवलं, ज्या व्यक्तीनी लेखकाच्या जीवन ओंजळीत अनुभवांची सुमने प्रदान केली, त्यांच्या आठवणींना शब्दबद्ध करून एक प्रकारे जगण्याची एक वेगळी बाजू उलगडली आहे. लेखक अनिल पाटील हे मध्य रेल्वे सोलापूर विभागात गेली ४० वर्षे नोकरी करीत होते. सेफ्टी कौंसिलर - ट्रैफिक या पदावरुन ते सेवानिवृत्त झाले. निवृत्तीनंतर त्यांनी लेखनाचा छंद जोपासला. त्यांची 'थैंक्यू बाप्पा' , 'आठवांचा इंद्रधनु' ही पुस्तके प्रकाशित झाली आहेत. सध्या एका लोकप्रिय दैनिकात त्यांचे लेखन सदर सुरु आहे. सदरात प्रकाशित झालेल्या लेखांपैकी निवडक २२ लेखांचा संच म्हणजे 'बकुळ फुले ' हा लेखसंग्रह होय. लेखक रेल्वे विभागात कार्यरत होते त्यामुळे त्या क्षेत्रातील एकूण वातावरण, कामांची विभागणी, कामकाज, रेल्वे विभागातील विविध पदे, अचानक उद्भवणाऱ्या समस्या आणि सुरक्षा विभागात काम करण्याचे अनुभव अशा नेहमीपेक्षा वेगळ्या विषयांवर आधारित हे लेख आहेत. आपण फक्त प्रवासापुरते स्टेशनवर जात असतो ,पण त्या व्यतिरिक्त रेल्वे फलाटावर राहणारे निराधार कुटुंब, कोणी व्यसनी माणसे, भिक्षेकरी तेथील गजबजाट, सतत होणाऱ्या घोषणा किंवा तिकीट काउंटरवर होणारी बाचाबाची अशा विविध अनुभवांची शिदोरी लेखकाने आपल्या कार्यकाळात जमवली आहे. त्यात कुटुंबातील छोट्या- छोट्या क्षणांना तिलांजली देऊन आपलं कर्तव्य बजावणारे लेखक या लेखांमध्ये दिसून येतात. लेखांची रचना मुद्देसुद असून एक प्रकारचा प्रवाहीपणा त्यात आहे.प्रथमपुरुषी निवेदनशैली मनस्वी आहे, एक प्रकारे लेखक वाचकांशी संवाद साधत आहेत.

या लेखांमध्ये जसे लेखकाचे मन उलगडत जाते, तसेच यात विविध व्यक्तिमत्त्वांची ओळख होत जाते. लेखांमधील व्यक्तिचित्रण वैशिष्ट्यपूर्ण आहे. स्टेशन मास्तर म्हणून लेखकाने कधीच या गोष्टीचा फायदा उचलला नाही. आपल्या हाताखाली काम करणाऱ्या प्रत्येक व्यक्तींना त्यांनी समान वागणूक दिली. वयाने आणि अनुभवाने मोठ्या असणाऱ्या व्यक्तीचा योग्य तो मान राखला. प्रामाणिकपणा, इतरांप्रति आदर, प्रेम, कामावरील निष्ठा, विनम्रता, इतरांना सांभाळून घेण्याची वृत्ती आणि जीवाची पर्वा न करता कर्तव्याप्रति समर्पित होऊन काम करणं , ही लेखकाची स्वभाववैशिष्ट्ये लेख वाचताना जाणवतात. माणूस जोडण्याची कला लेखकापाशी आहे, त्यामुळे एवढी माणसे त्यांनी जोडून ठेवली. त्यांच्याप्रति कृतज्ञता भाव त्यांनी जपला. लेखकाची ज्या ज्या स्टेशनवर बदली झाली, तेथील वातावरण , परिसराची माहिती अगदी सूक्ष्मपणे सांगितल्या आहेत. अचानक उद्भवलेले प्रसंग, त्यांनी दाखवलेले प्रसंगावधान , यामुळे टळलेला अपघात, सेफ्टी ऑफिसर म्हणून सतत निरीक्षण करणं , पाहणी करणं अशा विविध प्रसंगांच्या आठवणी यात नमूद केलेल्या आहेत.




या संग्रहातील काही लेखांमध्ये हे समाजाप्रति आपली भूमिका कशी असावी, यावरसुद्धा भाष्य केलेले आहे.सोबत आपल्या जीवनातील अगदी हळव्या आणि संवेदनशील क्षणांना शब्दात व्यक्त केले आहे. या लेखसंग्रहातील 'मोठ्या मनाची मोठी माणसं' या लेखात लेखकाने इ. स. १९९८ ते २००० या कालावधीतील मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागात मंडल रेल प्रबंधक म्हणून कार्यरत असणाऱ्या श्री. महीप कपूर यांच्या लाभलेल्या मार्गदर्शनाविषयी तसेच त्यांच्या कर्तव्यपरायणतेचे प्रसंग यात शब्दबद्घ केले आहेत. आपण एखाद्या ठिकाणी पर्यटनाला गेलो की तेथील प्रेक्षणीय स्थळे पाहण्यास जातो पण आजुबाजुच्या परिसरात अशाही जागा असतात ज्या समाजातील घटकांना आपलेसे करतात. 'सोलापुरातील आधुनिक तीर्थक्षेत्रे' या लेखात सोलापूर जिल्ह्यातील वृद्धाश्रम, अनाथालय, स्नेहालय बालकाश्रम, पाखर संकुल - अशा सामाजिक संस्थांची माहिती लेखकाने वाचकांपर्यंत पोहचवली आहे. वाढदिवस, लग्नाचा वाढदिवस किंवा इतर खास दिवस साजरे करण्यासाठी विनाकारण खर्च करण्यापेक्षा अशा व्यक्तिसोबत आपला आनंद वाटून घ्यावा, त्यांच्या चेहऱ्यावरील आनंद हीच खरी पावती असते. आजकालच्या सेलिब्रेशनच्या ठरावीक चौकटीला मोडून समाजाप्रती आपलेपणाची आणि कटिबद्धतेची जाणीव ठेवून जगणं गरजेचे आहे, हेच या लेखातून जाणवते. लेखक लवूळ स्टेशनवर कार्यरत असताना त्यांची सूटकेस हरवल्याचा किस्सा 'हरवले ते गवसले' या लेखात दिलेला आहे. हरवलेली सूटकेस नेमकी कशा प्रकारे सापडते ही पण एक गंमतच आहे. रेल संचलन करताना लेखकाच्या जीवावर बेतणारा प्रसंग 'काळ आला होता पण' लेखात वाचताना क्षणभर काळजात धस्स होते पण प्रत्यक्षात लेखकाची अवस्था कशी झाली असेल, याची कल्पनाही करु शकत नाही.हे काम किती जबाबदारीचे असते, याची प्रचिती देणारा हा लेख आहे.

या लेखसंग्रहाला लेखक नागेश शेवाळकर यांनी सविस्तर आणि वाचनीय अशी प्रस्तावना लिहिली आहे. या २२ लेखांवरील वाचकांच्या निवडक प्रतिक्रिया यात समाविष्ट केलेल्या आहेत. या प्रतिक्रिया वाचल्यानंतर जाणवते की, हे लेख वाचकांच्या पसंतीस उतरले आहेत.

लेखकाच्या आयुष्यात आलेल्या ह्या विविध व्यक्ती म्हणजे फुले आहेत, त्या फुलांची सुगंधी माळ म्हणजे 'बकुळ फुले ' लेखसंग्रह !

**( बकुळ फुले - लेखसंग्रह / लेखक : अनिल पाटील / प्रकाशक : शॉपिजन.इन / मूल्य : ३१४ रूपये)**

# “नैनों में बदरा छाए.......”

आधुनिक केसरी

**राजा परांजपेदिग्दर्शित `पाठलाग' (१९६४) हा लोकप्रिय रहस्यमय मराठी चित्रपट हिंदी चित्रपट निर्माते प्रेमजी यांना अतिशय आवडला आणि त्यांनी तो हिंदीत निर्माण करण्याचे ठरविले. चित्रपटाचे नाव ठरले `मेरा साया' (१९६६). दिग्दर्शक राज खोसला, गीतकार राजा मेहदी अली खान, संगीतकार मदन मोहन आणि नायिका साधना (नय्यर) हा `वह कौन थी' (१९६४) या चित्रपटाचा यशस्वी चौकोन `मेरा साया'साठी आला. नायक म्हणून सुनील दत्त यांची निवड झाली. सुनील दत्त-साधना जोडीचा `वक्त'नंतरचा (१९६५) हा दुसरा चित्रपट होय. साथीला के. एन. सिंह, अन्वर हुसेन, शिवराज, प्रेम चोपडा, जगदीश सेठी, मनमोहन, रत्नमाला, धुमाळ, मुक्री, तिवारी, बिरबल, सरोज खान आदी अव्वल सहकलावंत होते.**

या चित्रपटात दाखविल्याप्रमाणे मोठ्या मालमत्तेचा मालक असलेला वकील ठाकुर राकेश सिंह (सुनील दत्त) आणि त्याची सुस्वरूप पत्नी गीता (साधना) यांचा संसार सुखात चालू असतो. तो उच्च शिक्षणासाठी लंडनला जातो. एक वर्ष उलटते आणि राकेशला त्याची पत्नी गंभीर आजारी असल्याचा निरोप मिळतो. तो तातडीने मायदेशी परतून घरी येतो पण तिचे निधन होते.

दिवस सरत असतात आणि अचानक पोलिस निरीक्षक दलजीत (अन्वर हुसेन) त्याच्याकडे येऊन त्याला सांगतो, की आम्ही डाकू सूर्यवर सिंहच्या (प्रेम चोपडा) टोळीसह सुनयना (साधना) नावाच्या एका स्त्रीलाही पकडले आहे; पण ती आपण राकेशची पत्नी गीता असल्याचा दावा करते आहे. राकेश तिला भेटण्यासाठी जातो आणि त्याला आश्चर्याचा धक्का बसतो. ती स्त्री हुबेहूब गीतासारखी दिसत असते. पण राकेशने आपल्या हातांनी गीताच्या देहावर अंत्यसंस्कार केलेले असल्याने तो तिच्या बोलण्यावर विश्वास ठेवत नाही. पण ती स्त्री आपल्या म्हणण्यावर ठाम असल्याने प्रकरण न्यायालयात जाते. राकेश तिची उलटतपासणी घेतो आणि ती प्रत्येक प्रश्नाला बिनचूक उत्तर देते. आपल्याला अटक होण्यापूर्वी तीन दिवस कोणीतरी आपले अपहरण केले होते, असे ती न्यायालयात सांगते. ती खरोखरच गीता असते, की आणखी कोणी ? हा एखाद्या कटाचा भाग तर नसतो ? खरा प्रकार चित्रपटाच्या अखेरीस उजेडात येतो.

या चित्रपटातील "नैनो में बदरा छाए" हे लता मंगेशकर यांच्या स्वरांतील भीमपलासी रागात बांधलेले नितांतसुंदर गीत हा लता मंगेशकर-मदन मोहन-राजा मेहदी अली खान या अफलातून त्रिकुटाचा आणखी एक आविष्कार ! राकेश (सुनील दत्त) आराम खुर्चीवर पहुडलेला असताना अचानक त्याच्या कानावर सतारीचे सूर पडतात. कसबी छायालेखक व्ही. बाबासाहेब यांचा कॅमेरा राकेशच्या प्रशस्त राजस्थानी हवेलीवर फिरून गीताच्या स्मृत्यर्थ बांधलेल्या चबुतऱ्यावर येतो. राकेशला आपली दिवंगत पत्नी गीताच (साधना) आपल्याजवळ तिचे मनोगत उघड करीत आहे, असा भास होतो. त्या चबुतऱ्यावर दोघांवर हे गीत चित्रित झाले आहे. माझ्या नेत्रात जणू मेघांनी दाटी केली आहे. वीजही चमकते आहे. या वातावरणात मला तुला बिलगू दे. गेल्या जन्मापासून मी तुझी प्रेमकहाणी आहे; या जन्मीही तू मला आपलेसे करून घे, असे ती त्याला प्रेमाने विनवतेय.




या गीतात मदन मोहन यांनी सतार, तबला, ग्रुप व्हायोलिन, संतुर, मेंडोलिन आदी वाद्यांचा परिणामकारक वापर केला आहे. या गीताच्या ओळी पुढीलप्रमाणे :

**नैनों में बदरा छाए**
**बिजली सी चमके हाय**
**ऐसे में बालम मोहे**
**गरवा लगा ले**
**मदिरा में डूबी अखियाँ**
**चंचल है दोनों सखियाँ**
**छलती रहेगी तोहे**
**पलकों की प्यारी पखियाँ**
**शरमाके देंगी तोहे**
**मदिरा के प्याले**
**प्रेम दीवानी हूँ मैं**
**सपनों की रानी हूँ मैं**
**पिछले जनम से तेरी**
**प्रेम कहानी हूँ मैं**
**आ इस जनम में भी तू**
**अपना बना ले**

अनिल तोरणे
तळेगाव दाभाडे, पुणे

# चीन; विषाणूजन्य आजाराचे उगमस्थान



श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र.: ९९२२५४६२९५

आधुनिक केसरी

**२०२० ते २०२२ या दोन वर्षात कोरोना नामक विषाणूजन्य आजारापुढे संपूर्ण विश्व हतबल ठरले होते. कोरोनामुळे किती लोकांचा बळी गेला, किती कुटुंबे उध्वस्त झाली आणि कोरोनामुळे जग कसे बदलले हे ही आपण बघितले आहे. तब्बल दोन वर्ष कोरोनाने जगावर राज्य करून जग हादरवून सोडले. वैज्ञानिकांच्या महत्प्रयासाने कोरोना वरील लसीचा शोध लागला आणि जगातून कोरोना हद्दपार झाला. जगातून कोरोना हद्दपार झाल्याने गेले वर्ष - दीड वर्ष जगाने मोकळा श्वास घेतला.**

कोरोना हद्दपार झाल्याने आता कुठे जग पूर्वपदावर येत असतानाच चीन मधून पुन्हा एका नव्या विषाणूजन्य आजाराची बातमी आली आणि संपूर्ण जगामध्ये पुन्हा चिंतेचे वातावरण निर्माण झाले. हो चीनमध्ये सध्या एका नव्या विषाणूजन्य आजाराने धुमाकूळ घातला आहे. या विषाणूजन्य आजाराने लहान मुलांना घेतले असून चीनमधील लहान मुलांना या विषाणूजन्य आजाराने लहान मुलांना श्वसनाचे विकार होत असून, ताप सर्दी खोकला यासारख्या आजारांनी लहान मुले त्रस्त आहेत. या नव्या विषाणूजन्य आजाराने बीजिंग आणि त्याच्या पाचशे मैल परिसरातील सर्व रुग्णालये रुग्णांनी तुडुंब भरले आहेत. हा आजार रोखण्यासाठी या परिसरातील शाळांना सुट्टी देण्यात आली आहे अर्थात कोरोना इतपत हा विषाणूजन्य आजार धोकेदायक नसला तरी जगाची चिंता वाढवणारा आहे हे नक्की त्यामुळेच जगातील सर्वच देशांनी याबाबत दक्षता घ्यायला सुरवात केली आहे. भारतातही केंद्र सरकार आणि इंडियन मेडिकल कौन्सिल ( आय एम सी ) ने प्रत्येक राज्याला कारोना काळात देण्यात आलेल्या मार्गदर्शक तत्वांचे पालन करण्याच्या सूचना दिल्या आहेत. या विषाणूजन्य आजाराने अजून जीवितहानी झाल्याची बातमी नाही ही दीलासाजनक बातमी असली तरी कोणीही या विषाणूजन्य आजाराला हलक्यात घेण्यास तयार नाही कारण या विषाणूजन्य आजाराचे उगमस्थान हे चीन आहे. हो ज्या चीनमध्ये कोरोनाचा उगम झाला त्याच चीन मध्ये या नव्या विषाणूजन्य आजाराचा ही उगम झाला असल्याने अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. केवळ हा किंवा कोरोनाच नाही तर स्वाईन फ्लू, बर्ड फ्ल्यू, झिका यासारखे विषाणूजन्य आजारही चीनमधूनच सर्व जगात पसरले. सर्व विषाणूजन्य आजार चीनमध्येच कसे उगम पावतात हा सर्व जगाला पडलेला प्रश्न आहे. चीन हाच विषाणूजन्य आजाराचा उगमस्थान आहे मात्र चीन हे मान्य करत नाही अर्थात चीनच्या मानण्या न मानण्याने सत्य लपत नाही. कोरोना देखील आपले पाप नाही अशीच भूमिका चीनने घेतली होती मात्र नंतर सत्य उजेडात आलेच. चीनला जगावर राज्य करायचे आहे. अमेरिकेला मागे सारून जगातील सर्व सत्ताधीश महासत्ता व्हायचे आहे त्यासाठी ते जैविक अस्त्राची निर्मिती करत आहेत असा आरोप नेहमीच केला जातो. या जैविक अस्त्रांच्या निर्मितीतूनच अशा प्रकारचे विषाणूजन्य आजार निर्माण होत आहेत असा आरोप अमेरिका आणि युरोप खंडातील शास्त्रज्ञांनी केला आहे. अर्थात चीनने हे नेहमीप्रमाणे नाकारले असेल तरी चीनमध्ये काय चालले हे जगाला समजत नाही. चीन जे काय करतो ते सर्व गुपचूप करतो आणि जो कोणी यावर आवाज उठवतो त्याला चीन ढगात पाठवतो त्यामुळे चीनमधील अनेक गूढ गोष्टी जगापुढे येत नाहीत आता या नव्या विषाणूजन्य आजाराचे कारण ही चीन जगापुढे येऊ नये यासाठी आटापिटा करत आहे मात्र यामुळे जगाची डोकेदुखी वाढत आहे.

# रिसोड तालुक्यातील व्याड येथून आज युवा संघर्ष यात्रेचा होणार प्रारंभ..!

## जि. प. सदस्य अमित पाटील खडसे : शेकडो युवा होणार सहभागी

आधुनिक केसरी न्यूज

**वाशिम :** राष्ट्रवादी काँग्रेसचे युवा नेते आ. रोहीत पवार यांच्या नेतृत्वात पुणे ते नागपूर युवा संघर्ष पदयात्रा काढण्यात आली आहे. या संपूर्ण यात्रेदरम्यान रोहीत आर. आर. पाटील यांची विशेष उपस्थिती राहणार आहे. सदर यात्रा आज दि.29 नोव्हेंबर रोजी मराठवाड्यातून विदर्भात पदार्पण करत आहे. रिसोड तालुक्यातील व्याड तेथे राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष बाबाराव पाटील खडसे यांच्या हस्ते व मार्गदर्शनात पदयात्रेचे जल्लोषात स्वागत केले जाणार आहे. व्याड येथून सकाळी 8 वाजता वाशिम जिल्ह्यासाठी यात्रेचा प्रारंभ होणार आहे. या पदयात्रेत रिसोड तालुक्यातील राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्व जिल्हा व तालुका पदाधिकारी, जेष्ठ कार्यकर्ते आणि शेकडो युवायात्री स्वयंस्फूर्तीने सहभागी होणार असल्याची माहिती जिल्हा





परिषद सदस्य अमित पाटील खडसे यांनी दिली आहे.

सदर यात्रा व्याड येथून सकाळी 8 वाजता निघाल्यानंतर 10 वाजता चिखली, कवठा,11:30 वाजता वनोजा, तर दुपारी आसेगाव येथे जेवण व विश्रांती घेतली जाणार आहे. सायंकाळी 6 वाजता रिठद येथे सभा घेऊन वाशिम जिल्ह्यातील पुढील प्रवासासाठी पदयात्रा प्रस्थान करणार आहे. यात्रेसंदर्भात पुढे बोलतांना अमित पाटील खडसे म्हणाले की,आ. रोहीत पवार यांच्या नेतृत्वात निघालेली " युवा संघर्ष यात्रा " युवांच्या नेतृत्वाखालील एक चळवळ आहे. महाराष्ट्रातील युवांना भेडसावणाऱ्या आव्हानांना तोंड देण्यासाठी जनसमर्थन एकत्रित करणे आणि युवा वर्गाचा आवाज शासनापर्यंत पोहचवणे हा या पदयात्रेमागचा मूळ उद्देश आहे. या पदयात्रेचा एक भाग म्हणून आ. रोहीत पवार असंख्य युवांसोबत पुणे ते नागपूर पदयात्रा करत आहेत. यानिमित्ताने राज्यातील तरुण तरुणींना भेडसावणाऱ्या विविध समस्या सोडवण्यासाठी यात्रेच्या माध्यमातून जनतेशी संवाद साधत आहेत. सदर यात्रेत युवांना त्यांची मतं आणि अपेक्षा व्यक्त करण्यासाठी प्रोत्साहित केले जात असल्याने पदयात्रेत युवायात्री मोठ्या संख्येने व स्वयंस्फूर्तीने सहभागी होत असल्याची माहिती देखील अमित पाटील खडसे यांनी दिली आहे.

# यंदाचा पठ्ठे बापूराव पुरस्कार ज्येष्ठ लोकनाट्य कलावंत मालती इनामदार यांना जाहीर

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** यंदाचा पठ्ठे बापूराव पुरस्कार ज्येष्ठ लोकनाट्य कलावंत




मालती इनामदार यांना जाहीर झाला आहे. 30 नोव्हेंबरला या कलावंतांना जेष्ठ नेते शरद पवारांच्या हस्ते पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे. पुण्यातील बालगंधर्व रंगमंदिरात पुरस्कार प्रदान सोहळा आयोजित करण्यात आला आहे. मालती इनामदार यांच्याबरोबर शोभा इस्लामपूरकर, कृष्णा मुसळे आणि वैशाली वाफळेकर या लोककलावंतांचाही सन्मान करण्यात येणार आहे. लोककलांसाठी योगदान देणाऱ्या व्यक्तींना शाहीर पठ्ठे बापूराव प्रतिष्ठानच्या वतीने राज्यस्तरीय पुरस्कार देण्यात येतो. यंदा या पुरस्काराचे रौप्य महोत्सवी वर्ष आहे. प्रतिष्ठानच्या वतीने देण्यात येणारे यंदाचे पुरस्कारात शाहीर पठ्ठे बापूराव पुरस्कार जेष्ठ लोकनाट्य कलावंत मालती इनामदार यांना, लोकसाहित्यिक 'डॉ. भास्करराव खांडगे' पुरस्कार लावणी गायिका आणि नृत्यांगणा शोभा इस्लामपुरकर यांना,पवळा पुरस्कार लावणी नृत्यांगणा आणि गायिका वैशाली वाफळेकर यांना तर शाहीर 'बापुसाहेब जिंतीकर पुरस्कार' प्रसिद्ध ढोलकी वादक कृष्णा मुसळे यांना जाहीर झाला आहे. पठ्ठे बापूराव प्रतिष्ठान हे सन 1998 पासून दरवर्षी 'शाहीर पठ्ठे बापूराव पुरस्कार' देते. आतापर्यंत अनेक दिग्गज नृत्यांगणा या पुरस्काराच्या मानकरी ठरल्या आहेत. यामध्ये दिदराबाई गुळखंडकर, आशा काळे, शकुंतला नगरकर आणि छाया खुटेगावकर यांचा समावेश आहे. दरम्यान पुणे महानगरपालिकाही 1995 पासून दरवर्षी 'लोकशाहीर पठ्ठे बापूराव पुरस्कार देते.

# सिंदफणा शाळेत संविधान दिन, गुरुनानक जयंती उत्साहात

आधुनिक केसरी न्यूज

**माजलगाव :** येथील विद्याभवन शिक्षण प्रसारक मंडळ संचलित सिंदफणा पब्लिक स्कूलमध्ये संविधान दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. 26 नोव्हेंबरला रविवारची सुट्टी असल्याने सोमवार यादिवशी याचे खास आयोजन करण्यात आले होते. याशिवाय गुरुनानक जयंतीही मोठ्या थाटामाटात साजरी करण्यात आली. यावेळी घेण्यात आलेल्या कार्यक्रमात शाळेचे शिक्षक नागेश शेटे यांनी विद्यार्थ्यांना संविधानाचे महत्त्व तसेच यातील मूल्ये, नागरिकांचे अधिकार या विषयी सविस्तर मार्गदर्शन केले. शाळेचे उपप्राचार्य राहुल कदम यांनी विद्यार्थ्यांना गुरुनानक यांच्या जयंती निमित्त त्यांच्या कार्याविषयी माहिती दिली. अध्यक्षीय भाषणात प्राचार्य अन्वर शेख यांनी सर्व विद्यार्थ्यांना संविधान वाचण्याचे तसेच संविधानाची एक प्रत आपल्या घरी ठेवण्याचे आवाहन केले. यावेळी शाळेची विद्यार्थिनी संपदा पवार हिच्या समवेत सर्वांनी संविधानाच्या उद्देशिकेचे वाचन केले. कार्यक्रमाच्या शेवटी संविधानाचे महत्व, उद्देश्य, मूल्ये पोस्टरच्या माध्यमातून




दर्शविणारी संविधान रॅली काढण्यात आली. विद्यार्थ्यांनी आणलेल्या संविधान दिनाच्या संबंधित भित्तिपत्रकांनी शाळेतील बोर्ड सजवले होते. यामध्ये सर्व विद्यार्थी तसेच शिक्षकांनी सहभाग नोंदवला. या कार्यक्रमास प्राचार्य अन्वर शेख, उपप्राचार्य राहुल कदम, सामाजिक शास्त्र विभागाचे विभाग प्रमुख संतोष पालकर, विभागातील शिक्षक विजय फासाटे, अजय सावंत, शिक्षिका हेलन जॉर्ज, मीनाक्षी कुलकर्णी शैक्षणिक विभाग प्रमुख राजेंद्र सवई, सुजा चाको धनंजय सोमवंशी, अर्चना जाधव, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तथा आभार प्रदर्शन जिजाराम गडाख यांनी केले.

# सलग दुसऱ्या दिवशीही अवकाळी पाऊस

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** खुलताबाद तालुक्यातील बाजार सावंगी महसूल मंडळ मधे सलग दुसऱ्या दिवशीही अवकाळी पावसाने जोरदार हजेरी लावून नदी नाल्यांना पुरपाणी आणले. रविवार दि.२६ रोजी अवकाळी पावसाने सर्वत्र पाणीच पाणी करुन रब्बी पिकांचा व पालेभाज्यां चे तिन तेरा नऊ अठरा करुन ठेवले.ठिकठिकाणचे रस्ते वळण तोडफोड करुन टाकले,असे असताना दुसऱ्या दिवशी रात्री व तिसऱ्या दिवसी फटके बाजी चालुच ठेवली अवकाळीमुळे सर्वत्र पाणीच पाणी दिसून येत आहे.तर नदी नाल्यांना पुरपाणी वाहताना दिसत आहे.गत चार महिन्यांत ना पूर आले ना असे पाऊस पडले,ना पाणी वाहीले मात्र अवकाळीने दोन दिवसांपासून तुफान फटके बाजी करत अवकळा लावली.यात बाजार सावंगी महसूल मंडळ मधे लोणी बोडखा झरी इंदापूर रेल वरील क्षेत्रात अतिजोरदार फटकेबाजी होत असल्याने धाड दुथडी भरुन वाहीली आहे.व पूर सुरुच आहे.हे विशेष.तर विशेष करुन रात्री अतिशय जोराने अवकाळी पडत असल्याने भिती वाटत असल्याचे चित्र आहे असे नागरिकांतून बोलल्या जात आहे.

# वॉरियर्स बॉइजकडून संविधानाचे कार्य; अंदोरीच्या शाळेस संविधान उद्देशिका प्रतिमा भेट

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** शाळेतील विद्यार्थी आणि (माजी विद्यार्थी) वॉरियर्स बॉइज यांच्याकडून अंदोरी ता.खंडाळा येथील न्यू इंग्लिश स्कूल अँड जुनिअर कॉलेजमध्ये संविधान जागृती घडवून आणणारे महत्त्वपूर्ण कार्य करण्यात आले.शाळेत शिकणाऱ्या काही विद्यार्थ्यांनी आणि (माजी विद्यार्थी) वॉरियर्स बॉइज यांनी आपल्या आर्थिक योगदानातून भारतीय संविधानाच्या उद्देशिकेची प्रतिमा भेट दिली. या संविधान कार्याबद्दल विद्यार्थी आणि (माजी विद्यार्थी) वॉरियर्स बॉइज यांचे विशेष कौतुक करण्यात येत आहे. संविधान दिन आणि क्रांतिसूर्य महात्मा ज्योतीराव फुले यांच्या स्मृतीदिना निमित्त महापुरुषांना अभिवादन करत भारतीय संविधान उद्देशिका प्रतिमा भेट देण्याचा उपक्रम संपन्न करण्यात आला.

संविधानाची उद्देशिका प्रतिमा प्राचार्य पंढरीनाथ निगडे (सर) यांच्या कडे देत असताना शिक्षक संतोष ठोंबरे (सर) तसेच शिक्षकवृंद व विद्यार्थी उपस्थित होते. या भेटी बद्दल जय -भीम तरुण मंडळ (सिद्धार्थनगर) मधील वॉरियर्स बॉइजचे पै.सुरज खुंटे, दिनेश खुंटे,स्वप्निल खुंटे, अक्षय खुंटे, आर्यन खुंटे, महेश खुंटे, अजिंक्य खुंटे, अभिषेक दगडे, आदेश शिंदे, रोहन खुंटे, अनुराग खुंटे, मंगेश कांबळे, करण खुंटे, सागर खुंटे तसेच सुमेध खुंटे, प्रणय खुंटे संघर्ष खुंटे, सम्राट खुंटे, समीर खुंटे, सार्थक खुंटे, शुभम वाघमारे, प्रशिक ठोंबरे, सम्यक खुंटे, निरंजन खुंटे, अभिनंदन वाघमारे, सिद्धांत खुंटे, महेश खुंटे आदी विद्यार्थी यांचे सर्वांनीच कौतुक केले आहे.



# इगतपुरी, त्र्यंबकेश्वर तालुक्यातील शेतीला अवकाळी पावसाचा फटका

आधुनिक केसरी न्यूज

**इगतपुरी :** राज्यासह नाशिक जिल्ह्यातील इगतपुरी व त्र्यंबकेश्वर तालुक्याला अवकाळी पावसाने झोडपले असुन या बेमोसमी व अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचे उभे पीक आडवे होऊन शेतीमालाचे प्रचंड नुकसान झाले आहे. या पार्श्वभुमीवर आमदार हिरामण खोसकर यांनी थेट शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन पाहणी दौरा केला. शेतात सोंगुन ठेवलेले भात मातीत गेल्याने दोन दिवसांपासून पडणाऱ्या बेमोसमी पावसामुळे शेतीचे अतोनात नुकसान झाले आहे. या बरोबरच बागायती पिकांचे ही मोठे नुकसान झाले. दोन दिवसांपूर्वी मेघगर्जनेसह झालेल्या



गारपिटीने व अवकाळी पाऊस बरसल्याने भातपिकासह, नागली, वरई व हंगामातील बागाईत टॉमेटो, काकडी आदी बागायती पिकाची हानी झाल्याने शेतकऱ्यांचे अश्रु अनावर झाले आहेत. हातातोंडाशी आलेला घास मातीत गेल्याने शेतकऱ्यांच्या डोळ्यात पाणी आहे.

पशुपालनासाठी शेतात असलेला करड, तनस, कडबा, बांडी हा चारा भिजल्याने गुरांच्या चारा टंचाईच्या संकटामुळे पशुपालक चिंतेत आहेत. याबाबत आमदार हिरामण खोसकर यांनी नुकसान झालेल्या पिकांची पाहणी करून तात्काळ महसुल विभाग व कृषिविभाग यांनी संयुक्त पंचनामे करणे बाबत सुचना केल्या आहेत. तसेच कृषि विमा कंपन्यांचे जाचक अटी व नियमांप्रमाणे ७२ तासांच्या आत विमा कंपन्यांना कळविणे बंधनकारक असल्याने विमाधारक शेतकरी पिक नुकसानीचे फोटो पाठवुन तक्रार करण्यासाठी विमा कंपनीला फोन करत आहेत. मात्र काही तांत्रिक अडचणींमुळे संपर्क होत नसल्याने अडथळा येत आहे. तरी या बाबत संबंधित विमा कंपन्यांना तंबी द्यावी अशी मागणी लेखी पत्राद्वारे आमदार खोसकर यांनी जिल्हाधिकारी यांना केली असुन गेल्या २ दिवसांपासून आमदार खोसकर पिक नुकसान पाहणी दौरा करीत आहे. तहसिलदार व संबंधित अधिकाऱ्यांसह नुकसानीची पाहणी केली असुन या बाबत शासन दरबारी ही व्यथा मांडण्यासाठी प्रयत्न करणार असल्याची माहिती यावेळी आमदार खोसकर यांनी दिली.

# खो-खो किशोर संघ कर्णधारपदी आदित्य भंगाळे

## किशोरी संघ कर्णधारपदी आकांक्षा क्षीरसागर

आधुनिक केसरी न्यूज

**पालघर :** जिल्ह्यातील चिंचणी येथे आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय किशोर व किशोरी गटाच्या खो-खो स्पर्धेसाठी छत्रपती संभाजीनगरचा संघ जाहीर करण्यात आला आहे.

महाराष्ट्र खो-खो असोसिएशनने २०२३-२४ ची किशोर व किशोरी विभागाची ३८ वी राज्य अजिंक्यपद व निवड चाचणी स्पर्धा पालघर, जिल्हा खो- खो असोसिएशनच्या वतीने ३० नोव्हेंबर ते ३ डिसेंबर २०२३ या कालावधीत चिंचणी, पालघर येथे आयोजित करण्यात आली आहे.

सदरील स्पर्धेसाठी छत्रपती संभाजीनगर जिल्हा किशोर - किशोरी संघ सहभागी होणार आहे. छत्रपती संभाजीनगर जिल्हा किशोर संघ कर्णधारपदी आदित्य भंगाळे तर किशोरी संघाच्या कर्णधारपदी आकांक्षा क्षीरसागर यांची निवड करण्यात आली आहे.

**संघ पुढीलप्रमाणे :-**

किशोर संघ :- कर्णधार आदित्य भंगाळे, ओम लोंढे, शुभम पोले, हिमांशू ठाकरे, सुशांत गावित, समर्थ हातकंगणे, तेजराज होले, सार्थक दौंगे, गणेश गरबडे, रुद्र पुंड, कार्तिक साळुंखे, निखिल तारू, निल भदाणे, इशांत पटणे, गोकुळ गावित.

प्रशिक्षक :- प्रमोद गुंड, व्यवस्थापक :- आकाश खोजे

किशोरी संघ :- कर्णधार आकांक्षा क्षीरसागर, वैष्णवी भावले, आर्या गोर्डे, वैष्णवी कुटे, विद्या गोर्डे, मानसी इंगळे, ऋतुजा पडसावणे, शर्वरी भगत, रुद्राणी सोळुंखे, दिशा इंगळे, सरिता भालेकर, वैष्णवी पाठसावणे, ऋतुजा जाधव, भक्ती इंगळे, कांचन रामने.



प्रशिक्षक :- मनोज पारधी, व्यवस्थापिका :- सुनिता साळुंखे.

दोन्ही संघास छत्रपती संभाजीनगर येथील नावाजलेली बियाणे कंपनी अजित सिड्स प्रा. लि. तर्फे गणवेश देण्यात आला आहे.

वरील संघास छत्रपती शाहू महाराज शिक्षण संस्था सचिव मा. पद्माकर काका मुळे, छत्रपती संभाजीनगर जिल्हा खो-खो असोसिएशनचे अध्यक्ष श्री. समीरभैया मुळे, महाराष्ट्र खो-खो असोसिएशनचे सरचिटणीस श्री. गोविंद शर्मा, माजी छत्रपती संभाजीनगर जिल्हा खो-खो असोसिएशन कार्याध्यक्ष श्री.बालाजी सागर किल्लारीकर, उपाध्यक्ष श्री. ऋषिकेश जैस्वाल, श्रीमती सारिका भंडारी, सचिव श्री. विकास सूर्यवंशी, सहसचिव श्रीमती भारती काकडे आणि छत्रपती शाहू महाराज शिक्षण संस्था जनसंपर्क अधिकारी संजय अंबादास पाटील यांनी अभिनंदन करून त्यांना स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्यात..

# अतिवृष्टमुळे रब्बी हंगामातील नुकसानीचे तत्काळ पंचनामे करून भरपाई द्यावी..!

## भूमिपुत्र शेतकरी संघटनेची मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**रिसोड :** गेल्या दोन दिवसापासून वाशिम जिल्ह्यासह संपूर्ण रिसोड तालुक्यात अवकाळी पावसाने थैमान घातले आहे. या धुव्वाधार झालेल्या पावसाने रब्बी हंगामातील जवळपास सर्वच पिकांचे अतोनात नुकसान झाले आहे. सदर नुकसानीचे तात्काळ पंचनामे करून शेतकऱ्यांना त्वरीत आर्थिक मदत देण्याची मागणी भूमिपुत्र शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष विष्णूपंत भुतेकर यांनी रिसोडच्या तहसीलदार प्रतिक्षा तेजनकर यांच्याकडे केली आहे.



रिसोड तालुक्यात अतिवृष्टी झाली असून काही ठिकाणी गारपीटसुध्दा झाली. त्यामुळे शेतकऱ्यांच्या शेतातील तुर, कापुस, भाजीपाला, हरबरा पीकाचे अतोनात नुकसान झाले आहे, त्यामुळे महसूल व कृषी विभागाच्या वतीने तात्काळ शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन पंचनामे करावे व नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तात्काळ आर्थिक मदत द्यावी अशी मागणी भूमिपुत्र शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष विष्णुपंत भुतेकर यांनी रिसोडच्या तहसीलदार प्रतीक्षा तेजनकर यांच्याकडे निवेदनातूनन केली आहे.भूमिपुत्र शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष विष्णुपंत भुतेकर यांच्या नेतृत्वात युवक राज्य उपाध्यक्ष केशव गरकळ, जिल्हा उपाध्यक्ष रवींद्र चोपडे, शहराध्यक्ष विकास झुंगरे पाटील, रवि जाधव यांनी रिसोडच्या तहसीलदार प्रतीक्षा तेजनकर यांची प्रत्यक्ष भेट घेऊन रिसोड तालुक्यात शेतकऱ्यांचे अतिवृष्टीने अतोनात नुकसान झाले असून शेतातील उभ्या तुरीचे नुकसान झाले आहे त्यामुळे महसूल विभागाच्या वतीने तात्काळ पंचनामे करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत द्यावी अशी मागणी निवेदनातून केली आहे.ज्या शेतकऱ्यांच्या शेतातील तुर, कापुस, भाजीपाला, फळबागासंह उभ्या पीकाचे अतिवृष्टीने नुकसान झाले आहे. त्यांनी तात्काळ रिसोडच्या तहसीलदार प्रतीक्षा तेजनकर तसेच कृषी विभागाशी संपर्क साधून आपल्या शेतातील नुकसानीचा आढावा द्यावा असे आवाहन भूमिपुत्र शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष विष्णुपंत भुतेकर यांनी शेतकऱ्यांना केले आहे.भूमिपुत्र शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष विष्णुपंत भुतेकर यांनी आज रिसोडच्या तहसीलदार प्रतीक्षा तेजनकर यांची भेट घेऊन अतिवृष्टीने झालेल्या शेतकऱ्यांना तात्काळ मदत द्यावी अशी चर्चा केली.यावेळी रिसोडच्या तहसीलदार प्रतीक्षा तेजनकर व तालुकाकृषी अधीकारी उलामाले यांनी सकारात्मक दृष्टिकोन समोर ठेवून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या शेतातील सर्व पीकनुसकानीचे पंचनामे तात्काळ करू व त्यांना मदत देण्यासाठी तत्पर राहू असे आश्वासन यावेळी दिले.यावेळी भूमिपुत्र शेतकरी संघटनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते बहुसंख्येने उपस्थित होते.



# विमलबाई पाटील महाविद्यालयात संविधान दिन

आधुनिक केसरी न्यूज

**नेर :** साक्री येथील श्रीमती, विमलबाई उत्तमराव पाटील कला व कै.डॉ. भास्कर सदाशिव देसले विज्ञान, महाविद्यालय साक्री येथे संविधान दिन साजरा करण्यात आला. साक्री येथील डॉ. देसले महाविद्यालयात संविधान दिनानिमित्त संविधानाच्या उद्देशिकाची शपथ घेण्यात आली. कार्यक्रमाच्या सुरुवातीला प्राचार्य, डॉ.पी. एस. सोनवणे यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन केले. त्यानंतर संविधानाचे महत्त्व सांगत असताना त्यांनी सांगितले की, संविधानाने भारताच्या प्रत्येक नागरिकाला स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय ही मुलतत्वे बहाल केली. भारतातील विविध जाती आणि पंथाचे लोक संविधानामुळे आज एकत्र गुण्यागोविंदाने नांदत आहेत. भारतीय संविधान हे जगातील सर्वश्रेष्ठ असे संविधान आहे. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. कैलास वाघ यांनी केले तर आभार डॉ. विजय देसले यांनी मानले. सदर कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील प्राध्यापक व प्राध्यापकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# शुद्ध पाणी पोचविण्याचा आनंद : आ. लोणीकर

आधुनिक केसरी न्यूज

**परतूर :** सेवली तालुका जिल्हा जालना येथे पिण्याचे शुद्ध पाणी सोडण्याकरिता विशेष प्रयत्न करून एक कोटी किमतीची 10 किलोमीटर लांबीची पाईप लाईन टाकून आज सेवली गावात पिण्याचे शुद्ध पाणी घरा घरात पोहचविन्याचा उद्देश पूर्ण झाला असल्याचा खूप आनंद असल्याचे उदगार माजी मंत्री बबनराव लोणीकर यांनी सेवली येथील जाहीर सभेला संबोधन करताना केले. या वेळी व्यासपिठावर ज्ञानेश्वर माउली शेजूळ, जिजाबाई जाधव, गजानन उफाड, विक्रम उफाड, आदिल पठाण, विकास पालवे, कोमलसेठ कुचेरीया, डॉ. पालवे, कार्यकारी अभियंता गाढे दर्शन सिंग यांची प्रमुख उपस्थिती होती. पुढे बोलताना आमदार लोणीकर म्हणाले की आपण मंत्रीपदाच्या काळात मतदारसंघातील घराघरात पिण्याची शुद्ध पाणी पोहोचविण्याचा मनस्वी संकल्प केला होता. तत्कालीन मुख्यमंत्री फडणवीस आणी तत्कालीन अर्थ व नियोजन मंत्री मनगुंटीवार यांच्या माध्यमातून राबविण्यात आलेली योजना मतदारसंघातील परतूर मंठा व जालना गावात घराघरात पिण्याची शुद्ध पाणी पोहोचविल्यामुळे महिलांना लांब वरून पाणी आणण्याचा त्रास वाचल्याने महिलांमध्ये आनंदाचे वातावरण असून शिवली गावातील ग्रामस्थांनी 500 ते 700 रुपये भरून आपापली नळ कनेक्शन घराघरात घ्यावी अशी आवाहनही त्यांनी यावेळी केले.

# सौ. संध्या गोपाळराव देशपांडे यांचे निधन

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** कोथरूड येथील माणेक अपार्टमेंटमधील ज्येष्ठ नागरिक व सेवानिवृत्त शिक्षिका सौ. संध्या गोपाळराव देशपांडे ( वय ८१ ) यांचे नुकतेच अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, दोन विवाहित मुली, दोन मुले, सूना, नातवंड होत. परभणी जिल्ह्यातील पूर्णा येथे त्या जिल्हा परिषदेच्या



शाळेत अनेक वर्ष शिक्षिका म्हणून कार्यरत होत्या. अनेक विद्यार्थांना ज्ञानदानाचे व संस्कार घडविण्याचे काम त्यांनी केले.

कोथरूड भागात सामाजिक कार्याद्वारे अनेक परिवार त्यांनी जोडले. वैकुंठमध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले.




# पशुसंवर्धन विभागामार्फत जिल्हास्तरीय योजनेसाठी ऑनलाईन अर्ज करण्याचे डॉ. विजापुरे यांचे आवाहन

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** सन 2023- 2024 चे महाराष्ट्र शासनाचे पशुसंवर्धन विभागामार्फत नाविन्य पूर्ण व जिल्हा स्तरीय योजनांचे ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. अर्ज करण्यासाठी MAHABMS.COM या नावाचे संकेत स्थळास भेट द्यावी. हा अर्ज नजीकच्या सायबर कॅफेवरून किंवा स्वतःच्या दूरध्वनी वरून AH.MAHABMS या ॲप्लिकेशन वरून देखील करता येतो. 9 नोव्हेंबर 2023 पासून अर्ज स्वीकारण्यात येत आहेत आणि आठ डिसेंबर 2023 ही अर्ज करण्याची शेवटची तारीख असेल. ही योजना सर्व प्रवर्गातील व्यक्तींना लागू आहे. ॲप्लिकेशन करण्या साठी आधार कार्ड, सात बारा ,आठ आ चा उतारा बँक पासबुक ,रेशन कार्ड ही कागदपत्रे आवश्यक आहेत. दोन्ही योजनेअंतर्गत दोन दुधाळ गाई वाटप , 10 +1 शेळी वर्ग , 1000 मांसल कुक्कुट, तलंगा गट व एकदिवसीय सुधारित पिलांचे वाटप असे प्रायोजन आहे. तरी जास्तीत जास्त लोकांनी ऑनलाइन पद्धतीने अर्ज करावे असे आव्हान पशुवैद्यकीय दवाखाना बाजार सावंगी येथील पशुधन विकास अधिकारी डॉक्टर एस. जे. विजापुरे यांनी केले आहे अर्ज करण्यासाठी संबंधित व्यक्तीस कुठलीही अडचण आल्यास पशुवैद्यकीय दवाखान्यामध्ये संपर्क करण्याचे देखील त्यांनी सांगितले.

# तवेरा कार कन्नड घाटात कोसळून चार ठार

## काचेवरील दव पुसण्याचा प्रयत्नात घडला अपघात : चालकासह सहा जण जखमी

आधुनिक केसरी न्यूज

**संकेत बागरेचा**

**धुळे :** अक्कलकोट येथून स्वामी समर्थ महाराज यांचे दर्शन घेवून मालेगाव कडे जाणाऱ्या तवेरा वाहन चालकाने काचेवरील दव पुसण्याच्या नादात वाहनावरील ताबा सुटून कन्नड घाटात तब्बल 300 फूट खोल दरीत तवेरा कार पडून 4 जण जागीच मयत झाले.

तर तवेरा वरील चालकासाह 6 जण गंभीर जखमी झाले असून जखमीवर खासगी रुग्णालयात उपचार सुरु आहेत चाळीसगाव ग्रामीण पोलीस स्टेशनला तवेरा चालकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मालेगाव येथील भाविक 26 नोव्हेंबर रोजी रात्री 11.30 वाजेच्या सुमारास तवेरा वाहन क्र. MH 41 V 4816 ने अक्कलकोट येथुन स्वामी समर्थ महाराज यांचे दर्शन घेवून मालेगांव जात असतांना कन्नड घाटात समोरील काचेवर दव जमा झाल्याने सदर वाहन चालकाने जमा झालेले दव वाहनाचा वेग कमी करुन किंवा थांबवुन पुसुन घेणे आवश्यक असताना

तसे न करता वाहन चालकाने वाहनाचा वेग कमी न करता काचेवरील दव पुसण्याचा प्रयत्न करित असतांना चालक अभय पोपटराव जैन 50 (रा. सटाणा नाका मालेगाव जि नाशिक) याचा वाहनावरील ताबा सुटला त्यामुळे वाहन खोल दरीत जवळपास 300 फूट कोसळून झालेल्या अपघातात सौ.वैशाली धर्मेंद्र सुर्यवंशी 42, प्रकाश गुलाबराव शिर्के 68, सौ. शिलाबाई प्रकाश शिर्के 62, कु. पुर्वा गणेश देशमुख 7 सर्व रा. मालेगाव, जि. नाशिक यांचा जागीच मृत्यू झाला तर चालकासह अनुज धर्मेंद्र सुर्यवंशी 19, कृष्णा वासुदेव शिर्के 5, सौ.पुष्पा पुरुषोत्तम पवार 41, सिध्देश पुरुषोत्तम पवार 7, सौ. रुपाली गणेश देशमुख 35 हे गंभीर जखमी झाले असून त्यांना खासगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे.

पोलीस निरीक्षक संदीप पाटील, महामार्ग API रुपाली पाटील, PSI योगेश माळी, ASI राजेंद्र साळुंखे, PHC संदीप पाटील, शंकर जंजाळे, नंदु परदेशी, युवराज नाईक, भुपेश वंजारी, विजय शिंदे, ज्ञानेश्वर बडगुजर, संदीप माने, मनोज पाटील, नरेंद्र बाविस्कर, जोशी व चाळीसगांव शहर पोलीस स्टेशनचे पोहेकॉ राहुल सोनवणे, नितिन वाल्हे,



पोलीस नाईक महेंद्र पाटील, भुषण पाटील, अमित बाविस्कर, पोकाँ समाधान पाटील, ज्ञानेश्वर गिते व महामार्ग पोलीस स्टेशनचे पोहेकाँ गणेश काळे, विरेंद्र शिसोदे, शांताराम थोरात, सुशिल पाटील, योगेश पवार, विकास खैरनार, पोना जितेंद्र माळी, पोकाँ ललित महाजन, गणेश पवार यांनी सर्वांनी तात्काळ मदत कार्य केले. तसेच सदर अपघात स्थळी चाळीसगांव पोलीसांनी मदतीचे आवाहन केले असता स्वतःचे जिवाची पर्वा न करता खोल दरित पोलीसांसोबत खाली उतरुन जखमींना वर आणण्यात मदत करणारे चाळीसगांव शहरातील वसिम चेअरमन, स्वप्निल जाधव, नवाज शेख राजु, मुज्जफर रज्जाक शहा, ईकबाल शेख निसार, फरीद खान, मुबारक खान, सलिम खान, इम्रान खाटीक, सिंकदर शेख, जुबेर खाटीक, नईम खाटीक, गोगा शेख (पहेलवान) यांचे पोलीस निरीक्षक संदीप पाटील यांनी आभार मानले तसेच त्यांचा पो.स्टे.च्या वतीने सत्कार करण्यात येणार आहे.




# बौद्ध धम्म समजून घेण्यासाठी दीक्षा घेणे आवश्यक : वाघमारे

## डोंगरकडा येथे रंगली सप्तरंगी साहित्य मंडळाची ७७ वी काव्यपौर्णिमा

आधुनिक केसरी न्यूज

**नांदेड :** आपण सर्व जन्माने बौद्ध आहोत. पण स्वतःला बौद्ध म्हणवून घेण्यासाठी रीतसर बौद्ध धम्माची दीक्षा घेतली पाहिजे. बौद्ध व्यक्ती धम्मसंस्कार, चारित्र्य, वर्तन आणि वैचारिक प्रबुद्धता यावरून ओळखल्या जातो. बौद्ध धम्म समजून घेण्यासाठीही दीक्षा घेणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन येथील सप्तरंगी साहित्य मंडळाचे संस्थापक अध्यक्ष अनुरत्न वाघमारे यांनी केले. यावेळी सप्तरंगी साहित्य मंडळाचे राज्य समन्वयक बाबुराव पाईकराव, कार्याध्यक्ष प्रज्ञाधर ढवळे, ज्येष्ठ कवी थोरात बंधू, बौद्धाचार्य अंबादास कांबळे, लखन पंडित, विलास पंडित, विजय पंडित, साहेबराव पंडित, प्रविण पंडित, गोमाजी पंडित, विठ्ठल इंगोले आदींची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मारोती पंडित हे होते.

सप्तरंगी साहित्य मंडळाच्या वतीने दरमहा पौर्णिमेचे औचित्य साधून काव्यपौर्णिमा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते. डोंगरकडा ता. कळमनुरी येथील बुद्ध विहारात मंडळाच्या ७७ व्या काव्यपौर्णिमेचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला तथागत गौतम बुद्ध आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांचे पुष्प व दीप पूजन करून अभिवादन करण्यात आले. सामुदायिक त्रिसरण पंचशील ग्रहण करण्यात आल्यानंतर घेण्यात आलेल्या काव्यपौर्णिमा कार्यक्रमात प्रज्ञाधर ढवळे, थोरात बंधू, अनुरत्न वाघमारे, अंबादास कांबळे, बाबुराव पाईकराव, अरविंद पंडित, अजिंक्य पंडित, सुमित्रा गजभारे यांनी सहभाग घेतला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कवी बाबुराव पाईकराव यांनी केले. सूत्रसंचालन रविकुमार पंडीत यांनी केले तर आभार मधुकर पंडीत यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी यशोधरा महिला मंडळाच्या मायाताई पंडीत, पंचशिला पंडीत,सविता पंडीत, दीक्षा पंडीत, संगिता पंडीत, प्रतिभा पंडीत, वच्छलाबाई पंडीत, बेबीताई पंडीत, अरुणा बाई पंडीत, वंदना पंडित, विजया पंडित, रमाबाई पंडीत, कांताबाई इंगोले, इंदिराबाई पंडीत, कौशल्याबाई पंडीत, जयशीला अटकोरे, पंचशिला अटकोरे, गिरजाबाई पंडीत तसेच सुरेश ईंगोले, गंगाधर पंडीत, किशनराव पंडीत, मिलिंद पंडीत, शरद पंडीत, चांदूजी पंडीत यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाला बौद्ध उपासक, उपासिका, बालक, बालिका यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# संत निरंकारी चॅरिटेबल फाऊंडेशनतर्फे भव्य रक्तदान शिबिर

आधुनिक केसरी न्यूज

**सुधाकर जेठे**

**छत्रपती संभाजीनगर :** सद्गुरू माता सुविक्षाजी महाराज यांच्या असिम कृपेने संत निरंकारी मंडळाच्या वालुज (बजाजनगर) विभागातर्फे दि. 26 नोव्हेंबर, रविवारी भव्य रक्तदान शिबीर श्री जागुत हनुमान मंदीर, मोरे वौक, बजाजनगर रोये सकाळी ९ ते ५ वाजेपर्यंत आयोजीत केले होते. या रक्तदान शिबीराचे उद्घाटन छत्रपती संभाजीनगर पश्विमते आमदार संजय शिरसाठसाहेब, हनुमान भोंडवेसाहेब, वृक्ष बैंकते विष्णुदास पाटील साहेब, जागुत हनुमान मंदीर संस्थानवे अध्यक्ष वी यु वानखेडे, साहेब संत निरंकारी मंडळाचे थारखा प्रमुख शिवाजी कुबडे जी तरोत घाटी रुग्णालयाच्या डॉ. सुनिता बनकर



यांची प्रमुख उपस्थिती होती. "रक्त हे रस्तावर वाहन्यापेक्षा ते मानवाच्या धमन्यांमध्ये वाहिले पाहीजे" हा संदेश निरंकारी बाबा हरदेव सिंहजी महाराजांनी संपुर्ण विश्वाला दिला, त्यांच्या उक्तीनुसार दरवर्षों अथा रक्तदान शिबीरावे आयोजन संपुर्ण विश्वामध्ये संत निरंकारी मंडळाच्या वतीने करण्यात येते. गेल्या ८ वर्षांपासुन वाळूज (बजाजलगर) शाखेत अथा भव्य रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात येते. या रक्तदान शिबीरासाठी बजाजनगर, संणजगाव, वाळूज, वडगाव, छत्रपती संभाजीनगर इ. ठिकाण्याहुन रक्तदाते एकत्रित झाले. या रक्त संकलन साठी शासकिय रुग्णालय (घाटी) २१ डॉक्टरांची टिम उपस्थित होते. या मध्ये डॉ ज्योती उगलमुगले, डॉ पदमा जैल आदींनी रक्त संकलन केले. निरंकारी मंडळाच्या वाळूज सेवादल युनिटने संपुर्ण रक्तदान शिबीराच्या सर्व सेवा यथस्वीरित्या पार पाडल्या. या महान रक्तदान अभियानाच्या जनजागुती साठी दि. २४ नोव्हेंबर रोजी वाहन रैली काढण्यात आली होती. या वाहन रैलीमध्ये रक्तदानाते महत्व दर्शविणारे फलक होउन संत निरंकारी मंडळाच्या सेवादल स्वंयसेवक उत्सफूर्त भाग घेतला.

# संत नामदेव महाराज रथ व सायकल यात्रेचे फुलंब्रीत स्वागत

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** भागवत धर्माचे ज्येष्ठ प्रचारक, संत शिरोमणी श्री नामदेव महाराज यांची ७५३ वी जयंती, संत श्री ज्ञानेश्वर महाराजांचा ७२७ वा संजीवन समाधीदिन सोहळा व शीख धर्माचे संस्थापक श्री गुरुनानकदेव यांच्या ५५४ व्या जयंतीनिमित्त श्री क्षेत्र पंढरपूर ते श्री क्षेत्र घुमान (पंजाब) अशा सुमारे २,१०० किलोमीटरच्या रथ व सायकल यात्रेचे रविवारी विठ्ठल नामाच्या जयघोषात फुलंब्री येथे आगमन झाले या वेळी सुहासभाऊ शिरसाठ मित्र मंडळाच्या वतीने मोठ्या उत्साहात स्वागत करण्यात आले.

भागवत धर्म प्रसारक मंडळ, राज्य पालखी सोहळा पत्रकार संघ आणि श्री नामदेव दरबार कमिटी घुमान (पंजाब) यांच्या संयुक्त विद्यमाने श्री संत नामदेव महाराज यांची श्री क्षेत्र पंढरपूर ते श्री क्षेत्र घुमान अशी रथ व



सायकल यात्रा काढण्यात आली असून शांती, समता, बंधुता या विचारांचा प्रचार-प्रसार करण्यासाठी या यात्रेत सर्व वयोगटातील सुमारे शंभर सायकलयात्री सहभागी झाले आहेत. या यात्रेने २३ नोव्हेंबर रोजी पंढरपूर येथून प्रस्थान ठेवले.

आज या यात्रेचे फुलंब्रीत मोठ्या उत्साहात व भक्तीमय वातावरणात आगमन झाले.

फुलंब्री नगरपंचायत येथे भाजपा जिल्हाध्यक्ष तथा माजी नगराध्यक्ष सुहासभाऊ शिरसाठ मित्रमंडळाच्या वतीने रथाचे स्वागत करण्यात येऊन चहा नाश्तट्याची व्यवस्था करण्यात आली. यावेळी नगरसेवक बाबासाहेब शिनगारे युवा मोर्चा शहराध्यक्ष वाल्मिक जाधव, ज्ञानेश्वर वाघ, किशोर जावळे, जीवन राऊत,कृष्णा शिनगारे, गजानन तावडे, नारायण वाघ, गणपत वाघ, विठ्ठल वाघमारे, सुरेश खटे, सागर वाघ,रत्नाकर राऊत, गजानन रघु, भागवत धर्म प्रसारक मंडळाचे अध्यक्ष सूर्यकांत भिसे, उपाध्यक्ष शंकर टेमघरे, सचिव ॲड विलास काटे, खजिनदार मनोज मांढरे, विश्वस्थ राजेंद्रकृष्ण कापसे, सुभाष भांबुरे, राजेन्द्र मारणे यांच्यासह सायकल यात्री उपस्थित होते.

# स्वातंत्र्य लढ्याकरिता सशस्त्र सेना घडवणारे लहुजी साळवे

## राज्याध्यक्ष बालाजी थोटवे : लसाकमच्या वतीने क्रांतिवीर लहुजी साळवे यांची जयंती

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** १८१८ सालापासून १८८१ पर्यंत भारतीय स्वातंत्र्य लढ्याकरिता सशस्त्र सेना घडवणारे एक धडाडीचे नेतृत्व/ वस्ताद म्हणून पुण्यामध्ये ज्यांनी कार्य केले त्या आद्य क्रांतिगुरू वीर लहुजी राघोजी साळवे अर्थात लहुजी वस्ताद यांचा जन्म १४ नोव्हेंबर १७९४ रोजी पुरंदर किल्ल्यानजीक पेठ या गावी झाला. लहुजींचे वडील राघोजी हे पेशव्यांच्या शिकारखान्याचे प्रमुख होते. यांचे मूळ गाव भिवडी. पुरंदर किल्ल्याच्या रक्षणार्थ साळवे परिवाराने दाखविलेल्या मर्दुमकीचा सन्मान म्हणून त्यांना छत्रपती शिवाजी महाराजांनी राऊत ही पदवी देऊन गौरविले होते, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत तथा लसाकमचे राज्याध्यक्ष बालाजी थोटवे यांनी केले, ते 27 नोव्हेंबर रोजी आयोजित लहुजी साळवे कर्मचारी महासंघ शाखेच्या छत्रपती संभाजीनगरच्या वतीने क्रांतिवीर लहुजी साळवे यांची जयंती व संविधान दिनानिमित्त जाहीर व्याख्यान व सत्काराचा कार्यक्रमात बोलत होते.

बालाजी थोटवे पुढे म्हणाले की, भारताच्या स्वातंत्र्यलढ्यात लहुजी वस्ताद यांचे फार मोठे योगदान आहे. पुणे येथे त्यांचे वास्तव्य होते. ते उत्तम लढवय्ये तसेच शिक्षक होते. तलवारबाजी, दांडपट्टा, लाठीकाठी, कुस्तीचे प्रशिक्षण ते पुण्याच्या गंज पेठ तालमीत देत असत. क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके, म. ज्योतिबा फुले,सदाशिराव परांजपे, मोरो विठ्ठल वाळवेकर, पोवळे अशा दिग्गजांसह अनेक देशभक्तांनी लहुजींच्या आखाड्यात तलवारबाजी, दांडपट्टा, लाठीकाठी, कुस्तीचे प्रशिक्षण घेतले. आज लहुजींचा क्रांतीकारी इतिहास मांडणे गरजेचे आहे.

ज्यावेळी क्रांतिवीर उमाजीराजे नाईक यांनी इंग्रजांविरुद्ध बंड पुकारले होते त्या बंडाला लहुजी वस्तादांनी सहकार्य केले. यासह वासुदेव बळवंत फडके यांच्या सशस्त्र उठावात देखील त्यांनी सहकार्य केले. १८५७ च्या स्वातंत्र्य लढ्यामध्ये देखील लहुजी वस्ताद यांचे कार्यकर्ते सक्रिय होते.



तसेच ज्योतिबा फुले यांच्या शैक्षणिक, सामाजिक उपक्रमात जोतिबा व सावित्रीबाई फुले यांनांच नाहीतर त्यांच्या शाळेलासुद्धा लहुजी वस्ताद यांनी संरक्षण दिले होते. त्यामुळेच पुण्यात शाळांची निर्मिती होत गेली.

14 नोव्हेंबर 1794 रोजी जन्मलेल्या लहुजी वस्ताद यांचे वडील राघोजी हे पेशव्यांच्या शिकारखान्याचे प्रमुख होते. पुरंदर किल्ल्याच्या रक्षणार्थ साळवे परिवाराचे योगदान लक्षात घेता त्यांचा सन्मान म्हणून छत्रपती शिवाजी महाराजांनी त्यांना राऊत ही पदवी देऊन गौरविले होते. दरम्यान, 1818 साली पेशवाई मावळली. तेव्हाच्या त्या अखेरच्या लढाईमध्ये राघोजी साळवे यांना वीरमरण आले. पुण्यात वास्तव्य असलेल्या लहुजी वस्ताद हे उत्तम लढवय्ये तसेच शिक्षक होते. ते पुण्याच्या गंज पेठ तालमीत तलवारबाजी, दांडपट्टा, लाठीकाठी, कुस्तीचे प्रशिक्षण देत होते. लहुजी वस्ताद यांनी 1818 ते 1881 या प्रदीर्घ कालावधीमध्ये ब्रिटिशांच्या विरोधात सशस्त्र क्रांतिवीर निर्माण केले. त्यांच्या या योगदानाबद्दल त्यांना आद्य क्रांतिगुरू या उपाधीनेही गौरविले जाते. महान अशा लहुजी वस्ताद यांनी 17 फेब्रुवारी 1881 रोजी अखेरचा श्वास घेतला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक कला शिक्षक लक्ष्मण जांभळीकर यांनी केले. आभार जिल्हा सचिव डी. व्ही. वाघमारे यांनी मानले. या कार्यक्रमाला वंचितचे फारूक अहमद, ॲड. दयानंद भांगे, सेवानिवृत्त अभियंता मधुसुदून कांडलीकर, बळीराम किनाळकर, व्यंकट भोसले, कॉ. भास्कर लहाने, पी.यू. आरसूड, गणेश् तुपे, विजय कांबळे, स्वाती राजकुंडल, सोनाली राजकुंडल, भुजंग गायकवाड, अरूण कांबळे आदींसह अनेक समाजबांधवांची उपस्थिती होती. कार्यक्रमासाठी प्रसिद्धी प्रमुख अतुल खंडगावकर यांनी परिश्रम घेतले.



नांदेड येथील महात्मा फुले यांना स्मृतिदिनानिमित्त जवळा देशमुख येथील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेत अभिवादन करण्यात आले. मुख्याध्यापक गंगाधर ढवळे यांनी महात्मा फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी शिक्षक नेते संतोष अंबुलगेकर, सहशिक्षक संतोष घटकार, मनिषा गच्चे, हैदर शेख, आनंद गोडबोले, मारोती चक्रधर, संकल्प गोडबोले, लक्ष्मण शिखरे उपस्थिती होती.

# आमदार किशोर जोरगेवार यांच्या हस्ते दाताळा येथील विकासकामाचे भुमिपूजन

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** स्थानिक विकास आमदार निधीतुन मंजुर दाताळा ग्राम पंचायतच्या म्हाडा क्रिडांगणाच्या आरक्षित जागेवर सौरक्षणभिंतीच्या बांधकामाचे आमदार किशोर जोरगेवार यांच्या हस्ते भुमिपूजन करण्यात आले. या विकास कामासाठी 22 लक्ष रुपये निधी मंजूर करण्यात आला असून भूमिपूजनानंतर सदर कामाला सुरवात होणार आहे.

आज पार पडलेल्या भूमिपूजन कार्यक्रमाला दाताळा सरपंच सुनिता देशकर, उपसरपंचा विजयालक्ष्मी नायर, सचिव गणेश कोकोडे, ग्रामपंचायत सदस्य बंडू मत्ते, मधुकर हिवरकर, सुशांत शर्मा, छाया डांगे, प्रतिभा काळे, अनीमा घागरगुंडे ,ज्योती किरकिरे, अनिल नरुले, मयुर मदनकर, अतुल गावड, नितेश शेंडे, देवेंद्र देशकर, अरुण जुंनघरे, दीपक निवल, साहेबराव कांबळे, लता मदनकर, किरण रोहने, उपरे, अक्षय काकडे, सूरज रसपायले, सहील चीवंडे, प्रशांत चीवंडे , उपरे, विजय गवड, पंकज खोपे, शुभम देहारकर, यश काकडे, अक्षय देशकर, अक्षय जोगी, योगेश पेलने, आर्यन चिकटे, संकेत गुरणुले, गौरव चैधरी, गाजानन पांडे आदी मान्यवरांची उपस्थिती होती.

चंद्रपूर विधानसभा क्षेत्राचे अपक्ष आमदार किशोर जोरगेवार यांनी विविध विभागाअंतर्गत मोठा निधी उपलब्ध करुन दिला असून या निधीतून मतदार संघातील शहरी भागासह ग्रामीण भागाचा विकास केल्या जात आहे. ग्रामीण भागात समाज भवन, सौंदर्यीकरण यासह मुलभूत सोयी सुविध उपलब्ध करण्यावर भर देत मोठा निधी खर्च केल्या जात आहे. शहरी भागाच्या विकासासाठीही मोठा निधी आमदार किशोर जोरगेवार यांनी उपलब्ध केला असून या निधीतून मतदारसंघात अभ्यासिका, समाज भवन, व ईतर मुलभुत सोयी सुविधेची कामे केल्या जात आहे.

दरम्यान दातळा येथील दाताळा ग्राम पंचायतच्या म्हाडा क्रिडांगणाच्या आरक्षित जागेवर सौरक्षण भिंत बांधण्यात यावी अशी मागणी ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आली होती. या मागणीची दखल घेत आमदार किशोर जोरगेवार यांनी स्थानिक विकास आमदार निधीतून सदर कामासाठी 22 लक्ष रुपयांचा निधी मंजूर केला आहे. या निधीतून येथील सौरक्षणभिंतिचे काम पुर्ण केल्या जाणार आहे. आज शुक्रवारी आमदार किशोर जोरगेवार यांनी या विकासकामाचे भुमिपूजन केले. ग्रामस्थांची मागणी पूर्ण करता आली आली. दाताळा गावाच्या विकासासाठी आपण कटिबद्ध आहोत. मतदार संघातील ग्रामीण भागाच्या विकासाला गती देण्यासाठी निधी उपलब्ध करुन देता आला. राज्य सरकारही ग्रामीण भागाच्या विकासासाठी प्रयत्नशील आहे. पूढेही या गावाच्या विकासासाठी आपण निधी देणार असल्याचे यावेळी आमदार जोरगेवार म्हणाले. सदर भूमिपूजन कार्यक्रमाला स्थानिक नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.



# चंद्रपूर शहरातील प्रलंबित बायपाससाठी १ डिसेंबरला एकदिवसीय धरणे आंदोलन

आधुनिक केसरी न्यूज




**चंद्रपूर :** चंद्रपूर हे महाराष्ट्रातील एक प्रमुख औद्योगिक शहर आहे. शहराची लोकसंख्या झपाट्याने वाढत आहे. यामुळे शहरातील वाहतूक व्यवस्था कोलमडून पडली आहे. शहरातील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी बायपास काढण्याचा प्रस्ताव मंजूर झाला होता. परंतु, प्रकल्प अद्यापही प्रलंबित आहे. या प्रकल्पाची अंमलबजावणी तातडीने करण्याची मागणी भूमिपुत्र संघटनेने केली आहे. या मागणीला पाठिंबा देण्यासाठी भूमिपुत्र संघटनेने १ डिसेंबर २०२३ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर दुपारी १२ ते ३ एकदिवशीय धरणे आंदोलन करण्याचा निर्णय घेतला आहे. या आंदोलनाचे नेतृत्व भूमिपुत्र संघटनेचे संयोजक दिनेश दादापाटील चोखारे करणार आहेत.

काँग्रेस नेते व भूमिपुत्र संघटनेचे संयोजक दिनेश दादापाटील चोखारे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना निवेदन दिले होते. त्यात त्यांनी म्हटले आहे की, चंद्रपूर शहराच्या मध्यभागातून राष्ट्रीय महामार्ग जातो. या महामार्गावरून दररोज हजारो वाहने ये-जा करतात. यामुळे शहराच्या मध्यभागी वाहतूक कोंडी होत असते. या कोंडीमुळे वाहनचालकांना अनेक तास थांबावे लागतात. यामुळे नागरिकांना आर्थिक आणि मानसिक त्रास होत आहे. चंद्रपूर शहराच्या बाहेरून बायपास काढण्याचा प्रस्ताव मंजूर झाला होता. परंतु, अद्यापही या प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झालेली नाही. बायपास रस्ता झाल्यास शहरातील वाहतूक कोंडी कमी होण्यास मदत होईल. यामुळे नागरिकांना वाहतूक कोंडीचा त्रास होणार नाही. तसेच, शहराची वाहतूक व्यवस्था सुव्यवस्थित होईल. या पार्श्वभूमीवर, मुख्यमंत्री शिंदे यांनी चंद्रपूर शहराच्या बायपास प्रकल्पाची तातडीने अंमलबजावणी करण्यासंदर्भात आवश्यक निर्देश द्यावेत, अशी विनंती निवेदनात करण्यात आली आहे. चंद्रपूर शहरातील वाहतूक कोंडी ही एक गंभीर समस्या आहे. या प्रकल्पाची तातडीने अंमलबजावणी झाल्यास शहरातील वाहतूक व्यवस्था सुधारण्यास मदत होईल.

# नवयुवक बाल गणेश मंडळने प्राप्त केला प्रथम क्रमांक

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** पालकमंत्री मुनगंटीवार यांच्याद्वारे आयोजित सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ स्पर्धा 2023 चे बक्षीस वितरण गांधी चौक चंद्रपूर येथे पार पडले या घेण्यात आलेल्या स्पर्धेमध्ये अनेक मंडळांनी सहभाग घेतला. या सर्व मंडळांमध्ये दत्तनगर नागपूर रोड चंद्रपूर येथील श्री नवयुग बाल गणेश मंडळाने प्रथम क्रमांक प्राप्त केला. या मंडळांनी यावर्षी थर्माकोल व प्लास्टिक विरहित पर्यावरण पूरक गणेश उत्सव साजरा केला या द्वारे विविध विषय मंडळाद्वारे मांडण्यात आले. त्यामध्ये सौरऊर्जा, रेन वॉटर हार्वेस्टिंग, अंधश्रद्धा निर्मूलन, कापडी पिशवीच्या वापर, सेंद्रिय शेती, मेरी माटी मेरा देश अंतर्गत देखावा, तसेच प्लास्टिक मुळे होत असलेल्या गोमातेच्या मृत्यू असे विविध विषय व त्यासोबतच 350 व्या श्री शिवाजी महाराज शिवराज्याभिषेक सोहळ्यानिमित्त राजगडाची आकर्षक कलात्मक प्रतिकृती देखावाच्या स्वरूपात सादर करत या मंडळांनी यावर्षी या स्पर्धेत प्रथम क्रमांक प्राप्त केला. मुनगंटीवार यांच्या हस्ते ५१ हजार रुपये व स्मृतिचिन्ह देऊन या मंडळाच्या सन्मान करण्यात आला मंडळाने मागील चार वर्षापासूनची परंपरा कायम ठेवल्यामुळे जनतेने मंडळाचे खूप खूप अभिनंदन केले आहे.

हिवराळे क्लिनिक ॲण्ड हर्बल हेल्थ केअर
9130174444
डॉ. के.बी. हिवराळे
आयुर्वेद जनरल फिजिशियन,
ॲक्युपंक्चर तज्ज्ञ
B.A.M.S., N.D.,C.M.S.& Ed(MUMBAI)
R.No.2366/12/2000
एमसीए/2022/10/बी/000839 बॉम्बे नर्सिंग होम परवाना क्र.218, औरंगाबाद
उपलब्ध सुविधा
- जुनाट सांधे दुखी (गुडघे दुखी)
- आम वात उदर रोग
- दमा व ॲलर्जी (जुनाट)
- चिकन गुनिया
- मनोकयीईक आजार
- त्वचा व गुप्त रोग
- स्त्रीयांचे आजार
- स्थूलपणा, मूळव्याध
- वंध्यत्व, संतती प्राप्ती
- कॅन्सर सल्ला, मुतखडा
- वजन वाढविणे
- वजन कमी करणे
- केसांच्या सर्व तक्रारी
- लहान मुलांची
- स्मरणशक्ती वाढविणे

पंचकर्म सुविधा (मुख्यकार्य) 1) वमन, 2) विरेचन, 3) बस्ती, 4) नस्य, 5) रक्तमोक्षन
अजिंठा रोड, सारा कॉलनी, फुलंब्री, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद

# मतदारसंघातील एकही शेतकरी मदतीपासून वंचित राहणार नाही

## लोणार तालुक्यात वादळी वाऱ्यासह गारपीट : शेतकऱ्यांचे नुकसान

आधुनिक केसरी न्यूज

**लोणार :** तालुक्यात २६ नोव्हेंबरच्या रात्री पासून धो धो पावसासह वादळी वारा व गारपीट झाली यामध्ये शेतकरी बाधवांच्या तोंडी आलेला घास निसर्गाने हिरावून घेतला. यामध्ये तूर कपाशी हरबरा गहू मकासह नेतशेडचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले व नुकसान ग्रस्त भागाची शेतकऱ्याच्या बांधावर जाऊन पाहणी केली व यांनी महसूल कृषी विभागाच्यायांनी महसूल कृषी विभागाच्या अधिकारी यांना तात्काळ पंचनामे करण्याचे आदेश दिले व प्रत्येक गावातील ग्रामपंचायतमध्ये ग्रामसेवक यांनी शेतकरी बांधवांच्या याद्या प्रसिद्ध करून चावडी वाचन करण्याचे आदेश दिले. तसेच शेतकरी बांधवांच्या बांधावरूनच महाराष्ट्र चे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना दूरध्वनी वरुन माहिती दिली. मुख्यमंत्री यांनी तात्काळ पंचनामे करून मदत देण्याचे आश्वासन दिले व शेतकरी बांधवांनी खचून न जाऊ नये सरकार त्यांच्या पाठीशी आहे, असे सांगितले.

लोणार तालुक्यातील पिंपळनेर,जांबुल,देऊळगाव वायसा या गावांची पाहणी केली व बाकी सर्वच गावाचे तात्काळ पंचनामे करण्याचे आदेश दिले. यावेळी माझ्या समवेत शिवसेना जिल्हा प्रमुख तथा बाजार समिती सभापती प्रा. बळीराम मापारी, तालुका प्रमुख भगवान पाटील सुलताने ,मा. सभापती शिवपाटील तेजनकर, युवा सेना तालुका प्रमुख गजानन मापारी, सरपंच अरुण मुंडे, संजय जितेंद्र घुले, पंडित मुंडे, ज्ञानेश्वर जारे, अशोक जारे, देऊळगाव वासया सरपंच सोपान सोनुने, विश्वास सोनुने, बाबाराव सोनुने, गजानन तारे, नायब तहसीलदार परळीकर, तालुका कृषी अधिकारी शितोळे, मंडळ अधिकारी केंद्रे, तलाठी मंदार तनपुरे, जीतेंद्र सानप आदी उपस्थित होते.



**शिवछत्र मित्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष नंदकिशोर मापारी पहाटे शेतकऱ्यांच्या बांधावर**
शिवछत्र मित्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष नंदकिशोर मापारी यांना नुकसानीची माहिती मिळताच पहाटेच शेतकऱ्यांच्या बांधावर धाव घेत नुकसानीची पाहणी केली . लोणार तालुक्यातील जांबुल व देऊळगाव वायसा येथील शेतकऱ्यांच्या शेतात जाऊन शेतकऱ्यांचे झालेल्या मोठे नुकसान नेट शेड, भाजीपाला, तुर, गहू, हरभरा पिकांच्या शेतात पाणी साचलेले आहे तर कुठे गारांचा थर असल्याचे चित्र पहावयास मिळाले . दरम्यान आपण खा . प्रतापराव जाधव व आ . संजय रायमुलकर यांच्या मदतीने शासकीय स्तरावरून मदत मिळवुन देण्याचे प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी सांगितले फोन लावून झालेल्या नुकसानची माहिती दिली .

# शेतकऱ्यांच्या मदतीसाठी ना. सुधीर मुनगंटीवार यांची मुख्यमंत्र्यांना साद

## पंचनामे करून भरपाई देण्याचा आग्रह

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** चंद्रपूर जिल्ह्याला 27 नोव्हेंबर 2023 रोजी अवकाळी पावसाचा फटका बसला. या पावसामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. यासंदर्भात तातडीने पंचनामे करून शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यात यावी, असा आग्रह राज्याचे वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्य व्यवसाय मंत्री तथा चंद्रपूरचे पालकमंत्री ना. श्री. सुधीर मुनगंटीवार यांनी मुख्यमंत्री श्री. एकनाथजी शिंदे यांना केला आहे. यासंदर्भात त्यांनी मुख्यमंत्री श्री. एकनाथजी शिंदे, कृषीमंत्री श्री. धनंजय मुंडे, महसूल मंत्री श्री. राधाकृष्ण विखे पाटील यांना पत्र लिहीले आहे.

चंद्रपूर जिल्ह्यात 27 नोव्हेंबरला सकाळपासून मुसळधार पाऊस झाला. काही तालुक्यांमध्ये विजांच्या कडकडाटासह वादळी पाऊस झाला. अवकाळी पावसामुळे चंद्रपूर जिल्ह्यातील खरीप धानाचे, तूर, कापूस या पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. खरीप हंगामात चंद्रपूर जिल्ह्यातील सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांचे खोडकिडा, बुरशीजन्य रोग व विषाणूजन्य रोगामुळे मोठे आर्थिक नुकसान झाले होते. सोमवारी झालेल्या अवकाळी पावसामुळे शेतातील पिकांचे आणखी नुकसान झाले. त्यामुळे नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या मदतीसाठी पालकमंत्री ना. श्री. सुधीर मुनगंटीवार यांनी पुढाकार घेतला आहे.



मुनगंटीवार यांनी अवकाळी पावसामुळे झालेल्या जिल्ह्यातील नुकसानाची तातडीने माहिती घेतली . पालकमंत्री या नात्याने त्यांनी अधिकाऱ्यांना आवश्यक ती कार्यवाही करण्याचे त्वरित आदेश दिले . इतकेच नव्हे तर यासंदर्भात मुख्यमंत्री श्री . एकनाथजी शिंदे, कृषिमंत्री श्री . धनंजय मुंडे, महसूल मंत्री . श्री . राधाकृष्ण विखे पाटील यांना तात्काळ पत्र देत अवकाळी पावसामुळे चंद्रपूर जिल्ह्यात झालेल्या पिकांच्या नुकसानीचे तातडीने पंचनामे करून शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यासंदर्भात संबंधितांना निर्देश द्यावे, असा आग्रह देखील ना . श्री . मुनगंटीवार यांनी मुख्यमंत्री यांनी महसूल व कृषिमंत्री यांना केला आहे .

# एवढा सोपा प्रश्न का सुटत नाही? : आ.संग्राम थोपटे

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** वेगवेगळ्या जातींमध्ये प्रयत्न सुरू आहेत की त्यांना त्यांच्या हक्काचा आरक्षणाचा मोबदला मिळावा, गणेश केसकर यांची मी माहीती बघितली. चांगला सुशिक्षित तरुण असल्याने त्यांनी सर्वपणे गॅजेट, कायद्याचा अभ्यास केलेला असल्याचे जाणवतं. मुद्दा असा आहे की र आणि ड या मधला फरक.परंतु खरी परिस्थिती पाहिली तर देशभरामधल्या जेवढ्या काही राज्यांनी ज्या त्या वेळी त्यांनी त्यांच्या चूक दुरुस्ती बद्दलचे जे प्रस्ताव केंद्राकडे पाठवले.त्याला त्या त्या वेळी केंद्र सरकारने तत्याठिकाणी मान्यता दिली.असं आताचं मागच्या महिन्यातलं गॅजेट त्यांनी मला दाखवलं. हा कागद बघितल्यानंतर एवढा सोपा प्रश्न असून ही हा प्रश्न का सुटत नाही.ह्याच उत्तर नेमकं मला ही समजत नाही.गणेश केसकर यांनी केलेली मागणी शंभर टक्के रास्त आणि योग्य आहे. तुमचा मी एक समाज बांधव म्हणून उद्याच्या हिवाळी अधिवेधात नक्कीच आवाज उठविला जाईल, असा विश्वास भोर वेल्हा मुळशी विधानसभा मतदारसंघाचे आ.संग्राम थोपटे यांनी व्यक्त केला. समावेशाचा विषय राहिलेला नसून फक्त चूक दुरूस्तीचा विषय आहे. समिती करा, ठीक आहे. चूक दुरुस्ती करत असताना आता त्याच्या मध्ये समावेशाचं नांव घेऊन दीर्घकाळ त्याला प्रलंबित ठेवलं. हे आता चुकीचं होईल. राज्य सरकार असेल कुणी ही असेल जे जे असतील त्यांनी जातीने लक्ष घालून करावं. एवढीच माझी त्यांच्याकडे मागणी राहील. तुमच्या उपोषणाला,मागणीला माझा पाठींबा आहे, असे सुद्धा आ.संग्राम थोपटे यांनी म्हटले. ते लोणंद ता.खंडाळा येथे सुरू असलेल्या गणेश केसकर यांच्या आमरण उपोषणास भेट दिल्यानंतर आपल्या भावना व्यक्त करत असताना धनगर आरक्षण प्रश्नी एकप्रकारे खंतच व्यक्त करत असताना या प्रश्नी आवाज उठविणार असल्याची ग्वाही दिली. यावेळी जिल्हा परिषदेचे माजी समाजकल्याण सभापती आनंदराव शेळके पाटील,जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष नितीन भरगुडे पाटील, माजी सभापती रमेश धायगुडे, हर्षवर्धन शेळके, संदीप शेळके, सुनील शेळके, रमेश कर्णवर,राहुल घाडगे, हिरालाल धायगुडे, गोरख धायगुडे,हरी गोपनर, अशोक शेळके,दादासाहेब



धायगुडे, ओंकार कर्णवर तसेच धनगर समाज बांधव उपस्थित होते. आ.संग्राम थोपटे म्हणाले की, आज मराठा, ओबीसी आरक्षणाचा विषय सुरू आहे. बऱ्यापैकी पुढाऱ्यांना गांवबंदी केलेली आहे. काही ठिकाणी कार्यक्रम शांततेत होत होते ते बंद झालेले आहेत. परंतु आता जे तुम्ही म्हणताय र आणि ड च्या फरकामुळे आपल्या समाजाची गेली अनेक वर्षांपासून झालेली वाताहत आणि फरफट निश्चितपणे या भविष्यातल्या जी आर मूळे सुधारू शकते. मुद्दा असा आहे की जर एखाद्या जातीला नवीन आरक्षणामध्ये समावेश करून घ्यायचा भाग असेल तर त्याठिकाणी एखाद्यावर अन्याय होईल अशी भूमिका असते.परंतू मुळामध्ये तुमचा समावेश त्याच्या मध्ये आहे. त्याचा मोबदला आपल्या समाजाला मिळत नाही. ही वस्तुस्थिती आहे. खरंतर हा सोपा आहे. आताच्या परिस्थिती मध्ये मी ही दुर्गम डोंगरी भागाचं प्रतिनिधित्व करतोय.भोर वेल्हा मुळशीमध्ये धनगर समाज अतिशय कठीण परिस्थितीमध्ये वाड्या वस्त्यावर दुर्गम डोंगरी भागामध्ये वास्तव्याला आहे. आम्ही आमचे समाज बांधव म्हणून गेल्या अनेक वर्षांपासून त्या ठिकाणी लाईट,पाणी,रस्ते पोहचविण्याचे काम आमचं एक कर्तव्य आणि जबाबदारी म्हणून करत आहे. खरंतर खंडाळा तालुक्यात सुद्धा धनगर समाज विशेष करून लोणंद पासून ते अहिरे पर्यंत जास्त मोठ्या प्रमाणात लोकसंख्या असलेला हा आपला भाग आहे .हा तालुका आजपर्यंत दुष्काळी तालुका म्हणून धरलेला आहे .गणेश केसकर म्हणाले की, आमचा विषय समावेशाचा नाही तर दुरुस्तीचा आहे.

गुप्तरोगाबाबत
काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट

महावीर
घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118
राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर